गुरुवार, २ मार्च २०२३

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २२३
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड



## चांद्रयान-३ इंजिनची यशस्वी चाचणी

**बंगळुरु** : चांद्रयान-३ मोहिमेसाठी प्रक्षेपक म्हणून वापरल्या जाणाऱ्या सीई-२० क्रायोजेनिक इंजिनची यशस्वी चाचणी नुकतीच घेण्यात आली. भारतीय अंतराळ संशोधन केंद्राने (इस्त्रो) या चाचणीची माहिती दिली. २४ फेब्रुवारीला तमिळनाडूच्या महेंद्रगिरी येथील इस्त्रोच्या प्रक्षेपण तळावर नियोजित २५ सेकंदांसाठी हे इंजिन प्रज्वलित करण्यात आले होते. इस्त्रोने दिलेल्या माहितीनुसार, चाचणीदरम्यान इंजिनची सर्व कार्यप्रणाली ठरल्याप्रमाणे कार्यान्वित झाली आणि त्याचे अपेक्षित परिणाम पहावयास मिळाले. त्यामुळे आता एकीकृत क्रायोजेनिक इंजिनला इंधनाची टाकी जोडल्यानंतर ते उड्डाणासाठी सज्ज होईल. चांद्रयान -३ ही भारताची तिसरी चांद्र मोहिम आहे. यात तीन प्रमुख मॉड्यूल असून त्यात वेग देणारे मॉड्यूल, लँडर मॉड्यूल आणि रोव्हर याचा समावेश आहे. अभियानातील गुंतागुंत पाहता तिन्ही मॉड्यूलमध्ये रेडिओ फ्रिक्वेन्सी स्थापन करणे महत्त्वाचे आहे.

अंतरंग

परशुराम घाट रुंदीकरणाचे काम पूर्णत्वाकडे/२

पनवेलमध्ये अवैध मद्य वाहतूक करणारे अटकेत/३

एनएमपीएलमध्ये बेलापूर ब्लास्टर्सचा विजय/८

# स्पर्धा परीक्षा उमेदवारांना वयोमर्यादा वाढवून द्यावी

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

**राज्यात कोरोनाच्या काळात कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या स्पर्धा परीक्षा उमेदवारांना वयोमर्यादेचा कालावधी वाढवून देण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून शासनाचे लक्ष वेधले.**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले की, राज्यात कोरोनाच्या काळात वयोमर्यादा ओलांडलेल्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना वयोमर्यादितील सवलतींचा कालावधी वाढवून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी डिसेंबर २०२२मध्ये मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्या अनुषंगाने कोरोनाच्या काळात शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात जाहिराती प्रसिद्ध न झाल्यामुळे अनेक उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ओलांडली गेल्यामुळे स्पर्धा परीक्षेस बसण्याची त्यांची संधी हुकली असल्याचे निदर्शनास आले आहे. असे असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच कोरोनाच्या काळात कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना सरळसेवा परीक्षेस बसण्याची संधी मिळण्यासाठी वयोमर्यादेतील सवलतीचा कालावधी वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली, अशी विचारणा या तारांकित प्रश्नात केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रश्नावर दिलेल्या उत्तरात सांगितले की, कोरोना कालावधीत पद भरतीच्या जाहिराती प्रसिद्ध न झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने १७.१२.२०२१च्या शासन निर्णयाद्वारे वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना परीक्षेला बसण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष बाब म्हणून डिसेंबर २०२१ ते २०२२ या कालावधीत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींच्या अनुषंगाने परीक्षेला बसण्याची मुभा दिली होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार जानेवारी २०२२पासून डिसेंबर २०२२ अखेरपर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून १९१४५ इतक्या पदांकरिता १२८ जाहिराती देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सन २०१६पासून दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींच्या सरासरी संख्येच्या तुलनेत ही संख्या दुपटीहून अधिक आहे.

जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ अखेरपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सदर जाहिरातींच्या अनुषंगाने होणाऱ्या परीक्षांना बसण्याची अतिरिक्त संधी कोविड कालावधीत वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना तरतुदीनुसार उपलब्ध झाली आहे. कोविड कालावधीत कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांची स्पर्धा परीक्षांना बसण्याची संधी हुकली आहे, अशी वस्तूस्थिती नाही, असे उत्तरात म्हटले आहे.






**मुंबई : अभ्यासू आणि कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी म्हणून राज्यभर ख्याती असलेले भाजपचे पनवेल मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास जाताना त्यांचे टिपलेले छायाचित्र.**

# विधिमंडळविरोधी वक्तव्य राऊतांना भोवणार

### दोन दिवसांत चौकशी, ८ मार्चला निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी विधिमंडळाविरोधात केलेल्या वक्तव्यावर बुधवारी (दि. १) सभागृहात मोठा गोंधळ निर्माण झाला. याबाबत दोन दिवसांत चौकशी करणार असून पुढील बुधवारी (दि. ८) हक्कभंग प्रकरणावर निर्णय देणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले आहे.



ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना विधिमंडळाचा चोरमंडळ असा उल्लेख केला. राऊतांविरोधात हक्कभंग आणण्याची मागणी भाजप नेते अतुल भातखळकर यांनी केली. यावर निर्णय देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन दिवसांत यासंदर्भात चौकशी करून पुढील निर्णय बुधवारी म्हणजेच ८ मार्चला जाहीर करू, असे सांगितले. त्यासोबतच निर्णय वाचून दाखवताना सभागृहाचा अवमान झाल्याची टिप्पणीही राहुल नार्वेकर यांनी केली.

विधिमंडळ हे चोरमंडळ आहे असे म्हणण्याचा अधिकार कुणालाही नाही. संजय राऊत हे जर तसं बोलले असतील तर ते चुकीचं आहे. विरोधक असो किंवा सत्ताधारी कुणीही समर्थन केलेले नाही. संजय राऊत हे तसे बोलले असतील तर चौकशी केली जावी, असे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी म्हटले आहे. या संदर्भातला जो काही वेगळा निर्णय असेल तो घेतला जावा असेही त्यांनी म्हटले.

**विधिमंडळाला चोर म्हणणे हे सहन करण्यासारखे नाही. विधानमंडळाला मोठी परंपरा आहे. आपल्या राज्याचे विधानमंडळ हे देशातील सर्वोत्कृष्ट असे विधानमंडळ आहे. विधिमंडळ म्हटल्यानंतर उद्धव ठाकरेसुद्धा सभागृहाचे सदस्य आहे. मग तेही चोरमंडळाचे सदस्य ठरतात. राऊतांनी केवळ चोरमंडळ नाही, तर गुंडमंडळ असा शब्दही वापरला आहे. आम्ही काय गुंड आहोत का? त्यामुळे राऊतांच्या विधानाचं समर्थन करता येणार नाही.**

**–देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

## 'परदेशी गुन्हेगारांसाठी स्थानबद्धता केंद्र सुरू करा'

अमली पदार्थ विक्री व्यवसायात नायजेरियन नागरिकांचा मोठा सहभाग सातत्याने दिसून येत असून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी स्थानबद्धता केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तसेच व्हिसा संपलेल्या नागरिकांना त्यांच्या मूळ देशात परत पाठविण्याबाबत तसेच अमली पदार्थांच्या वाढत्या घटनांवर आळा घालण्यासाठी शासनाने कारवाई करण्याबाबत तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, कारागृहातून शिक्षा भोगून मुक्त झालेल्या विदेशी नागरिकांना त्यांच्या मायदेशी परत पाठविण्यापूर्वी स्थानबद्ध करण्यासाठी राज्यात तात्पुरते स्थानबद्धता केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. संबंधित पोलीस ठाण्यामार्फत गुन्हा दाखल करून शिक्षेचा कालावधी संपल्यावर अशा नागरिकांना त्यांच्या मूळ देशात पठविण्याची कार्यवाही भारतातील उच्चायुक्त यांच्यामार्फत करण्यात येते. राज्यात अमली पदार्थांच्या व्यापारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र अमली पदार्थविरोधी कक्ष स्थापन केलेला आहे, तसेच अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थाबाबतचे समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. राज्यामध्ये ॲन्टी नार्कोटीक्स टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे, तसेच केंद्र शासनाच्या आदेशानुसार अमली पदार्थांवर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्को कोऑर्डिनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डिनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून समित्यांकडून आढावा घेतला जातो.

## निवडक

### डायबिटीज, ब्लड प्रेशरच्या औषधांचे दर निश्चित

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय औषधी मूल्य निर्धारण प्राधिकरण या विभागाने मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांवर घेतल्या जाणाऱ्या ७४ औषधांचे दर निश्चित केले आहेत. न्युट्रोपेनिया आणि एपिलेप्सी अशा आजारांवर उपचार म्हणून दिल्या जाणाऱ्या औषधांचाही या यादीमध्ये समावेश आहे.

### एसीबीकडून आमदार साळवी यांच्या हॉटेल, घराची मोजणी

**रत्नागिरी** : रायगड जिल्ह्यातील लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार रत्नागिरीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांच्या तेली आळीतील जुन्या घराची व मुख्य मार्गावरील हॉटेलची मोजणी घेतली. त्यानंतर खालची आळी परिसरातील नव्या घराचीही मापे घेण्यात आली. बांधकाम विभागाकडून याबाबतचा अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाला पाठवण्यात येणार आहे.

# सी-लिंकबाधितांसाठी सर्वपक्षीय बैठक

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावा शिवडी सी-लिंकबाधित मच्छीमारांच्या विविध समस्यासंदर्भात सर्वपक्षीय कमिटीची बैठक रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मच्छीमार बांधवांच्या विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात आली.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सर्वपक्षीय बैठकीला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रवींद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, शेकापचे नेते जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्यासह मच्छीमार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रकल्पबाधित मच्छीमारांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पुढील काळात संबंधित अधिकाऱ्यांसह बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे या बैठकीत सर्वपक्षीय नेत्यांनी सांगितले.

## पुण्यातील पोटनिवडणुकीचा आज जाहीर होणार निकाल

**पुणे : प्रतिनिधी**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या पुण्यातील कसबा पेठ आणि चिंचवड या विधानसभा मतदारसंघाची निवडणूक रविवारी झाली. आता गुरुवारी (दि. २) मतमोजणी होणार आहे.

कसबा पेठेसाठी मतमोजणीच्या २० फेऱ्या होणार आहेत, तर चिंचवडमध्ये एकूण ३७ फेऱ्या होणार आहेत. कसबा पोटनिवडणुकीतील प्रचारात राज्यातील वरिष्ठ नेत्यांनी उपस्थिती लावली. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार हेमंत रासने आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यातील चुरशीच्या लढतीकडे राज्यातील नागरिकांसह वरिष्ठ राजकीय नेत्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

आमदार लक्ष्मण जगताप यांचे निधन झाल्याने घेण्यात आलेल्या चिंचवड विधानसभेसाठी रविवारी मतदान प्रक्रिया झाली. गुरुवारी मतमोजणी होणार आहे. भाजपकडून अश्विनी जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे आणि अपक्ष राहुल कलाटे यांच्यासह २८ उमेदवारांचे भवितव्य गुरुवारी ठरणार आहे.


# आजपासून दहावीची परीक्षा

### रायगड जिल्ह्यात ३५ हजार ७३३ परीक्षार्थी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माधमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेला गुरुवार (दि. २)पासून सुरुवात होणार आहे. रायगड जिल्ह्यातील ३५ हजार ७३३ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. जिल्ह्यात ७४ परीक्षा केंद्रांवरही परीक्षा घेतली जाणार आहे.

परिक्षा निर्भय आणि मोकळ्या वातावरणात होण्यासाठी प्रशासनाने योग्य तयारी केली आहे. कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबवण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. यामध्ये तहसीलदार, पंचायत समिती गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी यांचा समावेश आहे. या



भरारी पथकांवर उपविभागीय अधिकारी यांची निरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे, तसेच जिल्हा पातळीवर पाच भरारी पथके तयार करण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक हे परीक्षा केंद्रांना भेटी देणार आहेत.

परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात परीक्षा देणारे विद्यार्थी, पर्यावेक्षक, परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेले कर्मचारी, भरारी पथके यांव्यतिरिक्त कुणालाही प्रवेश दिला जाणार नाही.

### डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्त

# श्रीसदस्यांकडून महास्वच्छता अभियान



**अलिबाग : प्रतिनिधी**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांचे वतीने महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त महास्वच्छता अभियान बुधवारी (दि. १) राबविण्यात आले. या अभियानात अलिबाग शहरातील २० किमी रस्ते, सरकारी कार्यालय परिसर, १.५० किमी. समुद्रकिनारा स्वच्छ करून ३९.७७७ टन कचरा संकलित केला.

या स्वच्छता मोहिमेमध्ये रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अलिबाग नगर परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंगाई साळुंखे, राजिप अधिकारी निलेश घुले, भालेराव, मंडलीक, जयंत गायकवाड व पोलीस विभागील कर्मचारीही सहभागी झाले होते.

या स्वच्छता अभियानात अलिबाग शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा न्यायालय, वनविभागाचे कार्यालय, तहसीलदार कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, अँटिकरप्शन कार्यालय, जिल्हा रुग्णालय, धर्मादाय आयुक्त, जिल्हा कोषागार इत्यादी कार्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला, तसेच अलिबाग बसस्थानक व समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली.

या महास्वच्छता अभियानामध्ये अलिबाग शहर स्वच्छता मोहिमेत १,९७५ श्रीसदस्य सहभागी झाले होते. टेम्पो, ट्रक्टर, ट्रक, घंटागाडी अशा एकूण ५८ वाहनांच्या सहाय्याने एकूण ३९.७७० टन कचरा संकलित करून अलिबाग नगरपालिका डम्पिंग ग्राउंड येथे जमा करण्यात आला.

# 'प्रोग्रेसिव्ह पनवेल'साठी मनपाची स्वच्छथॉन रॅली

**पनवेल : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ पनवेल शहरात राबविले जात असताना 'प्रोग्रेसिव्ह पनवेल' हा ब्रॅन्ड जनतेपर्यंत पोहचविण्याठी महानगरपालिका आणि आयटीम इस्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २८) स्वच्छथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सिंगल युज प्लास्टिकवरील निर्बंधांविषयी जनजागृती करण्यासाठी या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यार्थी हे समाजाचे भविष्य असतात. त्यांच्या माध्यमातून 'हरा गिला, सुखा निला' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वच्छथॉन रॅलीचे आयोजन केले होते. पनवेल महानगरपालिका आणि आयटीम इस्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छथॉन रॅली काढण्यात आली. या वेळी उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, आयटीएम महाविद्यालयाचे संचालक डॉ. संकल्प राव, रजिस्टार डॉ. किरण राणे, विभाग प्रमुख अनिल कोकरे, शैलेश गायकवाड, इन्फिनीटी फाउंडेशनचे आयुफ आकुला, सर्व निरिक्षक उपस्थित होते. उपायुक्त सचिन पवार यांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या कचरा पासबूक संकलन योजनेबद्दल माहिती दिली, तसेच ३आर- रियुज, रिसायकल, रिप्रोडच्यूस ही संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.




*महापालिका प्रोग्रेसिव्ह पनवेल बनण्यावर भर देत आहे. यासाठी तळागाळातील प्रत्येक नागरिकापर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहचविला पाहिजे. तरुण पिढीने यासाठी पुढाकार घ्यायला हवा. विविध महाविद्यालयांच्या माध्यमातून महापालिका स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहे.*

***–गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका***

सकाळी नवीन पनवेल येथील आयटीएम महाविद्यालयातून या स्वच्छथॉन रॅलीस सुरुवात झाली. आय्यपा मंदिर, रामकृष्ण मिशन कॉर्नर, सीकेटी कॉलेज, बिकानेर स्टेशन, एचडीएफसी सर्कल, डि मार्ट, फोनिक्स हॉटेल, आदई सर्कलवरून शेवटी पुन्हा आयटीएम महाविद्यालयात ही रॅली आली. आयटीम महाविद्यालयाचे शंभरहून अधिक विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या हातामध्ये स्वच्छता संदेश लिहलेले बॅनर देण्यात आले होते. महाविद्यालयात खास सेल्फी पॉंईट तयार करण्यात आला होता.

# परशुराम घाट रुंदीकरणाचे काम पूर्णत्वाकडे

## ■ मुंबई-गोवा महामार्गावर चाकरमान्यांचा प्रवास होणार सुखरुप

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील नागमोडी वळणाचा चिपळूणजवळ परशुराम घाट आहे. महामार्गावरील हा घाट जवळपास तीन किमीचा असला तरी गेल्यावर्षी पावसामुळे याच घाटातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना डोकेदुखी बनला होता. याच एकमेव कारण म्हणजे संथ गतीने सुरू असलेले घाटातील चौपदरीकरणाचे काम आता पूर्णत्वास येत आहे.

कामावेळी अर्धवट केलेल्या डोंगर कटाईमुळे पावसाळ्यात या डोंगराची माती, दरड महामार्गावर येऊन वाहतूक ठप्प होते. गेल्या पावसाळ्यात तर आठ वेळा दरड कोसळल्यामुळे वाहतूक बंद करुन पर्यायी मार्गाने वळवण्यात आली होती. कामासाठी घाट दोन महिने बंद करण्यात आला होता. पाऊस थांबल्यानंतर या घाटाच्या कामासंदर्भात



विशेष लक्ष देण्यात आले आहे. संबंधित प्रशासन आणि चिपळूणचे प्रांताधिकारी प्रवीण पवार यांच्या तत्परतेने घाटाच्या कामाकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

घाटातील रुंदीकरणाच्या कामालाही गती घेत दिवस-रात्र काम सुरू ठेवण्यात आले आहे. घाटाच्या मध्यापर्यंत काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. त्यानंतर आता अतिशय धोकादायक असलेल्या डेंजर झोनमध्ये संरक्षण भिंतीचे काम सुरू केले आहे. त्यामुळे घाटातील चौपदरीकरण पावसाळ्यापूर्वी बहुतांशी काम मार्गी लावण्याची शक्यता आहे.

**अवघड टप्पा पूर्ण**

महामार्ग चौपदरीकरणात परशुराम घाट अत्यंत अवघड टप्पा आहे. सर्वप्रथम पायथ्यालगत असलेल्या गावाला सुरक्षित करण्यासाठी उताराच्या बाजूने संरक्षण भिंत उभारली. पहिल्या टप्प्यातील ४५० मीटर लांबीची आणि दुसरी सुमारे दहा मीटर उंचीच्या संरक्षित भिंतीचे काम पूर्ण केले. या भिंतीमुळे डोंगराच्या खालील रस्ता सुरक्षित झाला मात्र आता घाटात अतिशय धोकादायक टप्पा मानला जातो. दरडीच्या ठिकाणी संरक्षण भिंत उभारली जात आहे.

# राऊत यांच्या प्रतिमेला मारले जोडे

## माणगावात शिवसैनिकांकडून जाहीर निषेध व्यक्त

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवसेना विधिमंडळ पक्षप्रतोद, उपनेते, आमदार भरत गोगावले यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर तसेच युवा सेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांच्या नेतृत्वाखाली माणगाव बसस्थानकासमोर शिवसेना, युवासेना, महिला आघाडी माणगांव तालुका यांचे वतीने बुधवारी सायंकाळी संजय राऊत यांचा निषेध करण्यात आला.

नवीन एसटी स्टॅन्डसमोर येथे विधिमंडळ हे चोरमंडळ आहे असे बेताल वक्तव्य करून महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाचा, जनतेचा, लोकशाहीचा, संविधानाचा अवमान करणाऱ्या वाचाळवीर संजय राऊत यांच्या प्रतिमेला




जोडे मारण्यात आले. या वेळी, त्यांना तत्काळ अटक करा, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.

जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण रायगडमधील शिवसैनिकांनी संजय राऊत यांचा तीव्र शब्दात समाचार घेत निषेध व्यक्त केला. या वेळी विपुल उभारे, राजीव साबळे, अरुण चाळके, वैभव मोरे, अरुणा वाघमारे, शर्मिला सुर्वे, स्वप्नील शिर्के यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी माणगांव तालुक्यातील सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात उपस्थित झाले होते. या वेळी संजय राऊत यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत धिक्कार केला.

# 'संजीवनी' वर्धापनदिनाच्या संगीत मैफलीने जिंकली रसिकांची मने

**कर्जत : प्रतिनिधी**

संजीवनी हॉस्पिटलच्या ४३व्या वर्धापनदिना निमित्त संगीत मैफलीचे आयोजन केले होते. या मैफलीत गायकांनी हिंदी-मराठी जुनी, नवी गीते सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली.

डॉ. अरुण पाटील आणि डॉ. अंजली पाटील यांच्या संजीवनी हॉस्पिटलच्या वर्धापनदिनाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. अरुण पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात १९८० साली हे हॉस्पिटल सुरू केले. त्या वेळी अनेक मित्रांनी मला सहकार्य केले. त्या वेळचे सहकारी आजही उपस्थित आहेत.

अनेकांना नवीन जीवन देण्याचे काम आमच्या सर्व टीमने केले आहे आणि अजूनही सातत्याने करीत आहे, असे स्पष्ट केले.

रेखा मालपुरे यांनी कविता सादर




करून डॉ. पाटील यांचा जीवनपट उलगडला. त्यानंतर गिरीश डोईफोडे यांच्या संगीत मैफलीची सुरुवात झाली. त्यांनी पुकारता चला हु मैं.., न तुम हमी जानते..., काही दूर जब दिल..., जिंदगी कैसी है पहेली.., जिंदगी का सफर..., हे निले गगन पे..., आते जाते..., मेरे सपनोकि रानी..., ये श्याम मस्तानी..., समा है सूहना..., किसीकी मुस्कराहतोमे..., अभि न जावो छोडकर..., कभी ना जावो छोडकर..., क्या खूब लगतच्या हो..., कभी कभी मेरे दिलमे..., दिलका भवर करे..., जिंदगी एक सफर..., लगजा गले..., चाहे तुम कुछ ना कहो... इना मीना डिका..., मी हाय कोळी... आई तुझे..., झिंग झिंग झिंगाट..., एकविरा आई तू... अशी एका पेक्षा एक सरस गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. चिमुकल्या दिया भानुशालीने इंग्रजी गीते सादर केली. तर सुज्ञ बोकील, अनिकेत घमंडी, अलका यादव यांनीही गीते सादर करून मैफलीत रंगत आणली.

डॉ. अंजली पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी डॉ. ज्योती सातपुते, मनीषा सुर्वे, श्रद्धा गावडे, मधुसूदन मानकामे, संदीप मुळगावकर, मोहन कराडकर, सुरेश सरदेसाई, सुरेश महाजन, अ‍ॅड. शिरीष देशपांडे, संदीप फुलगावकर, नीता पिंगळे, शुभदा निमकर, चव्हाण आदी उपस्थित होते.

# रेवदंड्यात महास्वच्छता अभियान

**रेवदंडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्त रेवदंडा येथे महास्वच्छता अभियान राबविले. महास्वच्छता अभियानात श्रीसदस्य व रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांनी सहभाग घेतला.

महास्वच्छता अभियानाचा प्रारंभ सकाळी सात वाजता करण्यात आला. रेवदंडा मोठे बंदर ते रेवदंडा पानसेवाडीपर्यंतचा मुख्य रस्ता तसेच, समुद्र किनाऱ्यावर जाणारा रस्तावर




श्रीसदस्यांनी श्रमदानाने स्वच्छता केली. रेवदंड्यातील मुख्य रस्ता दोन्ही बाजूने केरकचरा, वाढलेली झाडेझुडुपे काढून चकाचक करण्यात आला, तसेच रेवदंडा समुद्रकिनारी जाणारे मार्गातसुद्धा साफसफाई करण्यात आली. या स्वच्छता अभियानात जमा झालेला केरकचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली, जमा झालेल्या रस्ता चारचाकी वाहनाने योग्य ठिकाणी नेण्यात आला.

महास्वच्छता अभियानात श्रीसदस्य सहभागी झाले होते, तर रेवदंड्याच्या सरपंच मनिषा चुनेकर, ग्रामपंचायत सदस्य संदिप खोत, संतोष मोरे, निलेश खोत आदींसह पंचायत समिती अधिकारी यांनीही स्वच्छतेसाठी श्रमदान केले. सकाळी दहा वाजेपर्यंत हे स्वच्छता अभियान सुरू होते.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यपदी डॉ. दिलीप पांढरपट्टे



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यपदी अमरावती विभागाचे माजी विभागीय आयुक्त डॉ. दिलीप ज्ञानेश्वर पांढरपट्टे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल यांनी ही नियुक्ती केली आहे. नवनियुक्त सदस्य डॉ. पांढरपट्टे यांना आयोगाचे अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर यांनी पद व गोपनीयतेची शपथ दिली.

या वेळी आयोगाचे सदस्य डॉ. प्रताप रा. दिघावकर, सचिव डॉ. सुवर्णा सिद्धार्थ खरात, सहसचिव सुनील अवताडे आदी उपस्थित होते. आयोगाचे अध्यक्ष निंबाळकर यांनी सदस्य डॉ. पांढरपट्टे यांचे स्वागत करून परिचय करून दिला.

डॉ. पांढरपट्टे हे १९८७च्या राज्य सेवा तुकडीचे अधिकारी आहेत. त्यांनी उपजिल्हाधिकारी, उपायुक्त म्हणून कोकण भवनसह कोकणात सेवा बजावली आहे. सन २०००मध्ये त्यांना अपर जिल्हाधिकारीपदी पदोन्नती मिळाली. सन २०१५ मध्ये त्यांची भारतीय प्रशासन सेवेत नियुक्ती करण्यात आली.

सिंधुदुर्ग, रायगडचे मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे व सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यानंतर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव, अमरावती विभागाचे आयुक्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. डॉ. पांढरपट्टे यांनी प्रशासकीय सेवेत राहून साहित्यिक सेवा बजावली आहे.

## दुखवटा

### एच. बी. पाटील



**नवी मुंबई :** मुंबई कोर्ट वकील संघटनेचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. एच. बी. पाटील यांचे अल्पशा आजाराने ठाणे येथील ज्युपिटर रुग्णालयात निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७२ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा एड. अमित, मुलगी डॉ. शिल्पा, तीन बहिणी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. लोहमार्ग पोलीस आयुक्त मुंबईचे डॉ. रवींद्र शिसवे यांचे ते सासरे होत. अ‍ॅड. पाटील यांच्यावर गोठिवली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी आमदार गणेश नाईक, माजी आमदार संदीप नाईक, ज्येष्ठ वकील गजानन चव्हाण, राजन साळुंखे, पी. सी. पाटील, माजी महापौर सुधाकर सोनवणे, माजी उपमहापौर रमाकांत म्हात्रे, नवी मुंबई वकील संघटनेचे अध्यक्ष सुनील मोकल, नवी मुंबई, ठाणे, रायगड येथील वकील, ग्रामस्थ उपस्थित होते.

### रवींद्र मते



**चौक :** हातनोलीतील रवींद्र सखाराम मते या ३५ वर्षीय तरुणाचा अकस्मात मृत्यू झाल्याने चौक परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रवींद्र मते याला कावीळ झाली होती, मात्र त्याचे वेळेत निदान झाले नाही. त्यामुळे काविळ रक्तात पसरली होती. अनेक उपचार केले, परंतु उपचारादरम्यान रवींद्रचा मृत्यू झाला. भाजपचे रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे व स्वराज्य स्थापित छावा क्रांतिवीर सेनेचे चौक विभागीय अध्यक्ष एकनाथ मते यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, समुपदेशन शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे (महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) विभागीय कार्यालय मुंबई आणि प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई अंतर्गत व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिर अर्थात करिअर टॉक या विभागास्तरीय कार्यशाळेचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह,



पनवेल या ठिकाणी करण्यात आले होते.

इयत्ता १० वीच्या मराठा, कुणबी या दुर्लक्षित गटातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या करिअर टॉक या विभागस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन दत्तात्रय नवले उपजिल्हाधिकारी मेट्रो सेंटर पनवेल यांच्या हस्ते झाले.

या वेळी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई उपसंचालक मनीषा पवार, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पनवेल सिताराम मोहिते, समुपदेशक श्रीकांत शिनगारे, चंद्रकांत मुंडे, युवराज भोसले, दयानंद शिनगारे आणि विनोद घोरपडे तसेच प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई व पंचायत समिती पनवेल येथील विषय साधन व्यक्ती, मुख्याध्यापक आदी उपस्थित होते.

# केतकी खोत, रिया मसुरकर ठरल्या फ्यूजन फॅशन क्वीन



**मुंबई : प्रतिनिधी**

फ्युजन फॅशन क्वीन २०२३ ची प्रथम विजेती केतकी खोत (मयुरेश रहिवाशी संघटना इमारत, काळाचौकी) आणि द्वितीय विजेती रिया श्रीकांत मसुरकर (विघ्नहर्ता सोसायटी, महादेव पालव मार्ग, करी रोड) या दोघींची निवड करण्यात आली. रियाची डिझायनर व इंटरनॅशनल सर्टिफाईड मेकअप आर्टिस्ट समृद्धी शिवराम चव्हाण हिचेही मोलाचे सहकार्य लाभले.

आनंदी प्रतिष्ठानतर्फे काळाचौकी विभागातील मुलींसाठी फॅशन शो घेण्यात आला. आयोजक रुपाली चांदे (संस्थापक अध्यक्ष, महिला उपविभाग संघटक शिवडी विधानसभा) यांच्या अध्यक्षतेखाली आणि व्हीजे डान्स स्टुडिओचे संस्थापक विकी जयस्वाल यांच्या सहकार्याने हा उपक्रम झाला. नृत्याचे दिग्दर्शन हे विकी जयस्वाल यांनी केले, तर अनिल कोकीळ यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार देण्यात आले. परीक्षक पूर्वी गडा या होत्या. स्पर्धेचे अँकरिंग सिनेॲक्टर सागर सातपुते यांनी केले.

स्पर्धेसाठी सचिन पडवळ, अनिल कोकीळ, लता रहाटे, श्वेता राणे, दिव्या घाडीगावकर, वैभवी चव्हाण, जयसिंग भोसले, अनुराधा इनामदार, भारती पेडणेकर, शारदा बाणे, कांचन घाणेकर, नवऊर्जा फाऊंडेशनच्या धनश्री विचारे आणि मानसी जीवन कामत आदी उपस्थित होते.

# 'एसएनडीटी'च्या दूरस्थ शिक्षण केंद्राचा अभ्यासक्रम प्रवेश सुरु

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण केंद्र अंतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांच्या जानेवारी २०२३ करिता प्रथम वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया https://sndtoa.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर ऑनलाईन सुरू केली आहे.

प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि शैक्षणिक शुल्क याबाबतच्या तपशीलासाठी विद्यार्थिनींनी https://sndt.ac.in/cde/ या दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अधिकृत संकेत स्थळाला भेट द्यावी. प्रवेश घेताना कोणत्याही प्रकारची शंका अथवा समस्या असल्यास श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण केंद्र, सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू तारा रोड, सांताक्रूझ (प.), मुंबई- ४०० ०४९ येथे ०२२-२६६०८१९३ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा studentsupportcde.sndt.ac.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा. ऑफलाईन पद्धतीने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी दूरस्थ शिक्षण केंद्रास भेट देऊन आपला प्रवेश निश्चित करू शकतात, असे आवाहन करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**

**मार्ग प्रकल्प विभाग, जिल्हा रायगड ४०२३०१**

**Email :- rpdmahad.ee@mahapwd.com Ph. No. 02145 - 222243**

**NOTICE INVITING e-TENDER**

**Notice No. 10 for 2022-23**

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक ), मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडुन बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग, महाड यांनी राखून ठेवला आहे.

| ई निविदा काम क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | किल्ले रायगड येथे ए.एस.आय. टिकीट कक्ष ते होळीचा माळ पदपथ या मार्गावर बाजुची झिज होऊन येणारी माती रोखण्यासाठी कमी उंचीची दगडी संरक्षक भिंत बांधणे, बैठक व्यवस्था करणे व पदपथाची दुरुस्ती करणे, ता. महाड, जि. रायगड. | १,७१,७५,५६७.०० | १,५०,०००.०० | १५ महिने | ११८०.०० | आवश्यकता नाही |
| २ | किल्ले रायगड एम.टी.डी.सी. उपहारगृहाची दुरुस्ती करणे, ता. महाड, जि. रायगड. | १,८६,०६,७२९.०० | १,५०,०००.०० | १५ महिने | ११८०.०० | आवश्यकता नाही |
| ३ | किल्ले रायगड जिल्हा परिषद विश्रामगृहाजवळ संरक्षण भिंत व पदपथ करणे, ता. महाड, जि. रायगड | १,५८,७८,६१७.०० | १,५०,०००.०० | १२ महिने | ११८०.०० | आवश्यकता नाही |
| ४ | किल्ले रायगडवरील जिल्हा परिषद विश्रामगृहाचे मागील बाजुस विसावा लेड तयार करणे, ता. महाड, वि. रायगड | १,४१,५२,९३२.०० | १,४२,०००.०० | १२ महिने | ११८०.०० | आवश्यकता नाही |
| ५ | किल्ले रायगडावरील जिल्हा परिषद विश्रामगृहासमोरील जागा व जवळच्या जोत्याचे संवर्धन करणे, ता. महाड, जि.रायगड. | १,२६,६१,६३४.०० | १,२७,०००.०० | १२ महिने | ११८०.०० | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०१/०३/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१५/०३/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | मा.अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, यांचे कार्यालयात निविदापूर्व बैठक (१,२ आणि ३ कामांकरिता) | दिनांक **०८/०३/२०२३ वेळ ११.००** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) विभाग, कोकण भवन, नवी मुंबई ५वा मजला, यांचे कार्यालयात दिनांक **१७/०३/२०२३** वेळ **११.०० पासून** |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**रा.कि.सेल/माप्रवि/महाड/निविदा /११३**
**दिनांक : २७/०२/२०२३**

**सही/**
**(महेश. रा. नामदे)**
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड

## निवडक

### रसायनीत कंपनीमध्ये चोरी

**रसायनी :** येथील एचआयएल कंपनीमध्ये पितळी व तांबे धातुचे फायर हैद्राण्ट वॉल याची चोरी झाली असून या बाबतीत कंपनीचे अधिकारी एम चंद्रशेखर (वय ४९) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याबाबत चोरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धिरज सुभाष सोनावळे (रा. खाने आंबिवली) व अब्दुल कलाम बरकत अली शेख (रा. चांवढोली) यांची नावे आरोपी म्हणून समोर आली आहेत. त्याचा तपास वरीष्ठ अधिकारी बालवाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली लालासाहेब कोळेकर हे करीत आहेत.

### पनवेलमधून एक जण बेपत्ता



**पनवेल :** चहा पिऊन येतो असे चालकाला सांगून गेलेला क्लिनर अद्याप न परतल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तालुक्यातील भोकरपाडा सहारा कांदा गोडाऊन येथे एका ट्रक वर असलेला क्लिनर राजेश आसाराम खन्ना (वय ३०), उंची पाच फूट, रंग गोरा, बांधा मध्यम, दाढी बारीक, केस बारीक, चेहरा गोल, नाक सरळ असून उजव्या हातावर राजेश असे नाव गोंदलेले, अंगात पिवळ्या रंगाचा फुल शर्ट व निळ्या रंगाची जीन्स पँट व पायात चप्पल आहे. त्याला हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पोलीस नाईक दाणे यांच्याशी सपंर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मटका जुगारप्रकरणी कारवाई

**पनवेल :** एका झोपडीत मटका अवैध्यरित्या जुगार खेळणाऱ्या १० व्यक्तींवर गुन्हेशाखा कक्ष-०२ पनवेलच्या पथकाने धडक कारवाई केली असून त्यांच्याकडून ८१३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. चारफाटा उरण नजीक असलेल्या एचपी गॅस वितरण कार्यालयाच्या मागील बाजूस असणाऱ्या सिडकोच्या मोकळ्या भूखंडावरील एका झोपडीत बेकायदेशीरित्या कल्याण, मेन व जनता या नावाचा मटका जुगार खेळला जात असल्याची माहिती नवी मुंबई गुन्हेशाखा कक्ष -२ चे पोलीस हवालदार रूपेश पाटील यांना खबऱ्यामार्फत मिळाली होती. गुन्हेशाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून, मटका जुगार खेळणाऱ्या १० जणांना ताब्यात घेतले. या सर्वांविरोधात उरण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### मोटारसायकल चोरीला

**पनवेल :** रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. पनवेलजवळील उसर्ली गाव येथे राहणारे सचिन मोरे यांनी त्यांची मोटरसायकल एमएच ०१ बीव्ही ३४६२ विचुंबे ते पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी ही मोटरसायकल पळवून नेली आहे.

# श्री सदस्यांची स्वच्छता मोहीम

## पनवेल परिसर झाला चकाचक



(छाया : योगेश पाटील)



**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रभूषण डॉक्टर श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पनवेल पसिररात महास्वच्छता अभियान राबवून सुमारे ११ टन कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या अभियानात ४१९३ श्री सदस्यांनी श्रमदान केले. हे महास्वच्छता अभियान पद्मश्री महाराष्ट्र भूषण डॉक्टर आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉक्टर सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉक्टर श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या सौजन्याने राबवण्यात आले.

पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे परिसरात बुधवारी श्री सदस्यांनी महाराष्ट्र भूषण डॉक्टर श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभरात महास्वच्छता अभियान राबविले. स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी तसेच शहर स्वच्छतेसाठी जनजागृती निर्माण करण्याकरिता या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल परिसरात राबवलेल्या या स्वच्छता अभियानात चार हजार १९३ श्री सदस्यांनी एकत्रित येत पंचमुखी हनुमान मंदिर, डॉक्टर श्री. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपूल, उपजिल्हा रुग्नालय, पनवेल एस.टी आगार, पंचरत्न सर्कल, वडाळे तलाव, पनवेल रेल्वे स्थानक, गांधी हॉस्पिटल, लाईनआळी यांच्यासह कामोठे आणि खांदा कॉलनी परिसरातून सुमारे ११ टन कचरा गोळा केला.

या स्वच्छता अभियानाला लागणारे संपूर्ण साहित्य डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या कडून देण्यात आले. या अभियानात विविध राजकीय, सामाजिक संघटना तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

## उरणमध्ये १३.८ टन ओला, २३.१६ टन सुका कचरा जमा



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण शहर परिसर स्वच्छ करण्यासाठी अनेक श्री सदस्यांनी आपल्या हातात झाडू घेऊन, परिसर स्वच्छ केला. यात साधारणता १३.८ टन ओला कचरा आणि २३.१६ टन सुका कचरा उचलून, हा उरणचा परिसर स्वच्छ केला.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या सौजन्याने आणि डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थरूप डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने उरण येथे स्वच्छतेची मोहीम १ मार्च रोजी आखण्यात आली होती.

यात प्रामुख्याने, उरण मधील उरणपंचायत समिती कार्यालय परिसर, इंदिरा गांधी रुग्णालय परिसर, उरण न्यायालय परिसर, उरण तहसील कार्यालय परिसर, उरण नगर परिषद परिसर, उरण नगर परिषदेच्या शाळेचा परिसर, वीर सावरकर मैदान परिसर, आयटीआय परिसर, उरण बस स्टॅन्ड परिसर ओ एन जी सी परिसर आणि उरण शहरातील रस्ते आदी भागात उरण तालुका परिसरातील हजारो श्री सदस्यांनी पुढाकार घेऊन ही स्वच्छता मोहीम आखली होती. १८७६ श्री सदस्यांनी हातात झाडू, घमेले व फावडे घेऊन, तसेच जेसीबीचा वापर करत कचऱ्याचे ढिगारे उचलण्यात आले.

### संपूर्ण महाराष्ट्रात अभियान

उन्हाची तमा न बाळगता श्री सदस्यांचे हा उरणचा परिसर स्वच्छ करण्यासाठी हात पुढे सरसावत होते. हा परिसर स्वच्छ करताना त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान दिसून येत होते. आपण चांगले काम करीत आहोत. हा परिसर स्वच्छ झाला की रोगराई पसरणार नाही. यामुळे माणूस निरोगी राहील आणि माणसाला उत्तम आरोग्य लाभण्यास मदत होत राहील. या विचाराने हजारो श्री सदस्य ही स्वच्छतेची साफसफाई करण्यामध्ये व्यस्त झाले होते. हे स्वच्छता अभियान संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आले होते.

## रसायनी परिसरात एकोप्याचे दर्शन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगासह कोन विभागातील हजारो श्री सदस्यांनी सकाळपासूनच उपस्थित राहून स्वच्छता मोहीम राबविली. हि मोहिम बुधवारी (दि. १ मार्च) सकाळी महाराष्ट्रासह परदेशातही राबविण्यात आली.

स्वच्छता मोहिमेमुळे परिसरातील शासकीय कार्यालये व रस्ते चकाचक झाल्याचे दिसून आले. या वेळी स्वच्छता मोहीम राबविताना एकोप्याचे दर्शन झाल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे यावेळी श्री सदस्यांकडून जमा झालेल्या कचऱ्याची योग्य विल्हेवाटही लावण्यात आली. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्यावतीने स्वच्छतेसाठी रसायनी कोन विभागातील ठिकठिकाणच्या हजारो श्री समर्थ अनुयायांनी उपस्थित राहून महास्वच्छता मोहीम राबविल्याने जनमानसातून लोकप्रियता मिळत आहे.



(छाया : राकेश खराडे)

## गव्हाणमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमासह बक्षीस वितरण

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत २७ ते २८ फेब्रुवारी दरम्यान केंद्र स्तरीय कला क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, या महोत्सवात गव्हाण केंद्रातील १० शाळांमधील १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन आणि बक्षीस वितरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २८) झाले.

रायगड जिल्हा परिचदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत २७ ते २८ फेब्रुवारी दरम्यान केंद्र स्तरीय कला क्रिडा व सांस्कृतीक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात गव्हाण केंद्रातील १० शाळांमधील १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपले कलाकौशल्य सादर केले. या महोत्सवादरम्यान सोमवारी झालेल्या क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले तर मंगळवारी झालेल्या बैद्धीक व सांस्कृतीक कार्यक्रमाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.





या वेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठनेते वाय. टी. देशमुख, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, रघुनाथ देशमुख, प्रकाश कडू यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महोत्सवामध्ये झालेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा गुणगौरव केला.

## पनवेलमध्ये अवैध मद्य वाहतूक करणारे अटकेत

### ट्रकसह दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

गोवा राज्यात निर्मित व विक्रीसाठी असलेले विविध ब्रॅण्डच्या विदेशी मद्याचे अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रकला राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून १३१० खोके अवैध मद्यसाठा जप्त करण्यात आला. संबंधित आरोपींकडून मिळालेल्या माहितीनंतर हा मद्यसाठा ज्या गोदामात ठेवला जातो तेथे धाड टाकल्यावर अजून ७०९ खोके मद्याच्या बाटल्या भरलेले सापडले. या सर्व मद्याची किंमत सूमारे दीड कोटी रुपये आहे.



गोवा राज्यात निर्मित मद्यसाठ्याची अवैधपणे वाहतूक सूरु असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथकाचे निरीक्षक संताजी लाड, मनोज चव्हाण, दुय्यम निबंधक योगेश फटांगरे, शहाजी गायकवाड यांच्या पथकाने गोवा मुंबई महामार्गावर पनवेल तालुक्यातील शिरढोण गावाजवळ सापळा रचला. ट्रक क्रमांक एमएच ०४ ईव्हाय १९४९ या संशयीत ट्रकला रोखून त्याची तपासणी केल्यावर या ट्रकमध्ये सिमेंटच्या विटा त्याखाली लपवलेले एक कोटी तीन लाख ९८ हजार २०० रुपये किमतीचे १३१० खोके मद्यसाठा जप्त करून तीन आरोपींना अटक करण्यात आली. त्यानंतर आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार शिवलखन मोतीलाल केवट यास बामन डोंगरी परिसरातून ताब्यात घेतले.

याची अधिक चौकशी केली असता त्याने ही दारू मुंबईत आणून एका गोडाऊनमध्ये ठेवून नंतर मुंबईतील विविध हॉटेलमध्ये ती पुरवठा केली जात असल्याची माहिती दिली. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने गोडावून क्रमांक ९, प्लॉट क्रमांक १२९०, केडब्लयुसी नोड, खिडूकपाडा येथे छापा घालून सदर गोडावून मधून गोवा राज्यात निर्मित व विक्रीसाठी असलेले विदेशी मद्याचे ७०९ बॉक्स असा एकूण ५१ लाख १२ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून शिवलखन मोतीलाल केवट यास या गुन्ह्यात अटक केली. या गुन्ह्यात अद्यापपर्यंत एक कोटी ५४ लाख ३१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## भाजपच्या सरपंचातर्फे आधारकार्ड अपडेट शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आधारकार्ड धारकांसाठी डॉक्युमेंट अपडेट हे नवीन फिचर विकसित झाल्याने नागरिकांनी आधारकार्ड अद्ययावत करून घ्यावे यासाठी भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच (भाजप) तानाजी लक्ष्मण पाटील यांनी आपल्या निवासस्थानी नागरिकांसाठी आधारकार्ड अपडेट शिबिर आयोजित केले होते.

सन २०१५ पासून देशामध्ये युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया यांच्यामार्फत देशातील नागरिकांना आधारकार्ड देण्यात येते. बायोमेट्रिक प्रमाणिकरणासह रहिवाशाची ओळख पटविण्यासाठी आधारकार्ड हा ओळखीचा सर्वांत व्यापकपणे स्वीकारला जाणारा पुरावा आहे. नागरिकांकडून अनेक शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी आता आधारकार्डचा वापर केला जात आहे. यापुढे शासकीय व इतर सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपले आधारकार्ड अद्ययावत (अपडेट) करून घेणे आवश्यक आहे.



ज्या नागरिकांना आधारकार्ड मिळाले आहे, परंतु दहा वर्षांमध्ये एकदाही अद्ययावत केले नाही. त्यांची भविष्यात गैरसोय होऊ नये म्हणून भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच तानाजी लक्ष्मण पाटील यांनी आधारकार्ड अपडेट शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात ६५ नागरिकांनी आपले आधारकार्ड अपडेट करून घेतले.

## स्कूल व्हॅनमधून खाली पडून विद्यार्थी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा से २० फेज- ०२ याठिकाणी राहणारा एका नऊ वर्षीय शाळकरी मुलगा स्कूल व्हॅनमधून पडून जखमी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत जखमी झालेल्या मुलाचे नाव आबान राय (९ वर्षे) असे असून शिक्षिका असलेल्या त्याच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून झोया ट्रॅव्हल्स कंपनीच्या स्कूल व्हॅन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अबान राये असे जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे. अबान हा तळोजा फेज -१ मधील कालसेकर इंग्लिश स्कूलमध्ये तिसऱ्या इयत्तेत शिकतो. अबान हा झोया ट्रॅव्हल्स कंपनीच्या स्कूलमधून तक्रारीवरून शाळेतून ये जा करतो. दरम्यान तो स्कूल व्हॅनमधून खाली उतरत असतांना, त्याच्या बॅगच्या हॅंडल अडकल्याने तो घसरून खाली पडून या घटनेत तो जखमी झाला. या प्रकरणी अबान याची आई शमीरा राय यांनी दिलेल्या स्कूल व्हॅनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, शाळेच्या बसचालकांनी अथवा व्हॅनचालकांनी विद्यार्थी वाहतूक करताना सावधगिरी बाळगणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## वीर वाजेकर महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन साजरा

**उरण : वार्ताहर**

उरणमधील वीर वाजेकर महाविद्यालयाच्या मराठी विभाग आयोजित मराठी राजभाषा दिन सोमवारी (दि. २७) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास ज्येष्ठ गझलकार, कवी ए. के. शेख पनवेल हे होते.

प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी कवी कुसुमाग्रज एक प्रतिभावंत साहित्यिक म्हणून सर्वपरिचित आहेत. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेची सेवा केली आहे, असे मत आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्रा. गजानन चव्हाण, मराठी विभागप्रमुख यांनी करून दिली. महाविद्यालयाचे सकाळ सत्राचे उपप्राचार्य, डॉ. विलास महाले तसेच सर्व प्राध्यापक व



विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. बळीराम पवार यांनी आभार मानले. भाषा पंधरवड्या निमित्त आयोजित सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा घेतल्या होत्या. त्या स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना ग्रंथ व लेखणी भेट देऊन गौरविण्यात आले.

मंदिरा म्हात्रे (प्रथम वर्ष कला) हिने निबंध स्पर्धा प्रथम व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. अश्विनी कोळी (द्वितीय वर्ष वाणिज्य) हिने सुंदर हस्ताक्षर स्पर्धा प्रथम क्रमांक व निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. चिंतामण धिंदळे यांनी केले.

## संपादकीय


# कटुता टाळायची कुणी?

महाराष्ट्रातील राजकीय वातावरण सध्या जेवढे गढूळ झाले आहे तेवढे आजवर कधीच झाले नव्हते. खरे तर सध्याच्या राजकीय परिस्थितीला गढूळ हे विशेषण देखील अपुरे आणि मुळमुळीत ठरेल असे वाटते. राजकीय नेत्यांची परस्परांबद्दलची मुक्ताफळे ऐकली की सामान्यजनांचे कान आता किटू लागले आहेत. अशा प्रकारची खालच्या स्तरावरील गलिच्छ भाषा सामान्य मतदारांना बिलकुल आवडत नाही आणि त्याचा राग ते मतपेटीद्वारे व्यक्त करतातच, परंतु सध्याच्या काळात राजकीय नेत्यांचे नेमके हेच भान सुटलेले दिसते.

ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत हे गेली वीस वर्षांहून अधिक काळ राज्यसभेचे सदस्य आहेत. महाराष्ट्रातील एका महत्त्वाच्या राजकीय पक्षाचे प्रवक्ते पद त्यांनी अनेक वर्षे भूषवले आहे. आता त्यांचा पक्ष आक्रसून छोट्याशा गटापुरता उरला आहे हा भाग वेगळा, परंतु राजकारणात दोन–अडीच दशके घालवलेल्या व्यक्तीकडून थोड्याफार प्रगल्भतेची किंवा पोक्तपणाची अपेक्षा असते. दुर्दैवाने राऊत यांच्याकडून तशा प्रकारची अपेक्षा करणे म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी घालण्यासारखे ठरेल. रोजच्या रोज सकाळी नऊ–साडेनऊच्या सुमारास टीव्ही पत्रकारांना गोळा करून अद्वातद्वा बडबडण्याचा कार्यक्रम ते न चुकता पार पाडत असतात. बेताल बडबड, शिवराळ भाषा, बिनबुडाचे युक्तिवाद ही सारी त्यांच्या ‘मॅटिनी शो’ची वैशिष्ट्ये आहेत. त्यांना दिल्लीपासून गल्लीपर्यंत कुणी फारसे मनावर घेत नाही हा भाग अलाहिदा. शिवगर्जना यात्रेच्या निमित्ताने खासदार राऊत सध्या कोल्हापूरच्या दौऱ्यावर आहेत. बुधवारी सकाळी टीव्ही पत्रकारांच्या कॅमेऱ्यासमोर बोलताना नेहमीप्रमाणे त्यांची जीभ घसरली. विधिमंडळ हे विधिमंडळ नव्हे तर चोरमंडळ आहे असले आचरट वात्ताडन करून त्यांनी हक्कभंगाची कारवाई मात्र ओढवून घेतली. राऊत यांच्या या बेताल बडबडीमुळे विधिमंडळातील वातावरण दिवसभर कमालीचे तापले होते. लोकशाहीमध्ये टीका सकारात्मक पद्धतीने स्वीकारली जाते. किमान तशी अपेक्षा असते, परंतु अशी बडबडवजा टीका कोण किती काळ सहन करेल? विधिमंडळातील सर्वच पक्षांच्या सदस्यांचा पारा चढला होता. खासदार राऊत यांच्या वक्तव्याचा निषेध करताना सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी एकमुखाने कडक कारवाईची मागणी केली. इतकेच नव्हे तर राऊत यांना ताबडतोब अटक करण्याचे आदेश जारी करावेत, अशी मागणी केली. सत्ताधारी पक्षाबरोबरच खुद्द खासदार राऊत यांच्या पक्षालादेखील त्यांच्या वक्तव्याचे समर्थन करता आले नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या त्यांच्या मित्र पक्षाच्या आमदारांनादेखील निषेध नोंदवावा लागला. कारण ज्या विधिमंडळाला राऊत यांनी चोरमंडळ असे म्हटले, त्याच सभागृहाच्या सदस्यांमध्ये माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे हेदेखील आहेत. एकंदरीत सत्ताधारी पक्षाने खासदार राऊत यांच्या वक्तव्याचा निषेध करताना आक्रमक पवित्रा घेतल्याने सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले. या साऱ्या प्रकारात महाविकास आघाडीच्या नेत्यांची चांगलीच कुचंबणा झाली. तथापि खासदार राऊत यांच्या वक्तव्याचा निषेध करणार असाल तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधीपक्षाच्या नेत्यांना देशद्रोही म्हटले होते, त्यावरही कारवाई करा अशी उलटी ओरड विरोधकांनी सुरू केली. लोकशाहीमध्ये विशेषत: संसदीय व्यवस्थेमध्ये सर्वांनीच आपल्या भाषेबद्दल जागरूक राहायला हवे. सध्या आलेली कटुता टाळायला हवी, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक नेत्यांनी मध्यंतरी व्यक्त केले होते, त्याचे काय झाले हा प्रश्नच आहे.

# आंबा पिकाचे संरक्षण आवश्यक

**खबरबात**
**शैलेश पालकर**



राष्ट्रीय विकास योजनेंतर्गत फलोत्पादन कीड व रोग नियंत्रणासाठी सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प राज्यातील प्रत्येक तालुक्यात कृषी विभागामार्फत दरवर्षी राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये गावपातळीवरील आंबा पिकावरील किड व रोगांचे निरीक्षण करून ऑनलाईन माहिती संकलीत करून कृषी विद्यापिठाकडून सल्ला प्राप्त केला जातो. या सल्ल्यानुसार तातडीने कार्यवाही करण्याकरिता व शेतकऱ्यांना वेळेत मार्गदर्शन मिळण्यासाठी कृषी विभागामार्फत सल्ला पत्रके काढून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविली जातात. या प्रकल्पाच्या माध्यमातून कीड व रोगांचे योग्य व्यवस्थापन करून संभाव्य नुकसान टाळण्यात येत असल्याने अधिकाधिक आंबा शेतकऱ्यांनी या प्रकल्पाचा घेण्याची आवश्यकता आहे.

पोलादपूर तालुक्यातून आंबा पिकाचे क्षेत्र अधिक असलेल्या कोतवाल खुर्द आणि आडावळे खुर्द या दोन गावांची निवड करण्यात आली असून या गावांमध्ये क्षेत्रानुसार व शेतपरिस्थितीनुसार दोन निश्चित प्लॉटप्रमाणे एकूण चार प्लॉटची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. तालुक्यातील उर्वरित ६२ आंबा उत्पादक गावांमधून क्षेत्र कमी असल्याकारणाने रॅण्डम पध्दतीने धावते सर्वेक्षण करण्यात येणार असून या कामासाठी तालुक्यात कीड व रोग सर्वेक्षकांची निवड करण्यात येते. प्रत्येक सोमवार, मंगळवार, गुरुवार व शुक्रवार या प्रतिदिनी दोन गावांचे सर्वेक्षण याप्रमाणे प्रत्येक आठवड्यात आठ गावांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाद्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीची ऑनलाईन डाटा एन्ट्री करण्यात येणार असून कृषी विद्यापिठाकडून याबाबत सल्ला प्राप्त झाल्यानंतर संबंधित सल्ला पत्राद्वारे, वर्तमानपत्राद्वारे, रेडीओ आणि दूरदर्शनद्वारे तसेच गांवनिहाय बैठका घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असते. आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी वेळीच कीड व रोग नियंत्रणासाठी प्रयत्न करावेत याकरीता उपाययोजनेसाठी ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना किटकनाशके व औषधपुरवठा करून संभाव्य नुकसान टाळून पीक वाढीचे प्रयत्न करणे शक्य होणार आहे.

**अवकाळी पाऊस आंबा पिकाचा खरा शत्रू**

कोकणात अवकाळी पावसाने आंबा, कोकम काजू आणि फणसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याखेरिज, करवंद, बोरं, तोरणं आदी रानमेवा झडून गेल्याने आदिवासी समाजाचीही रोजी–रोटी अडचणीत आली आहे. पोलादपूर तालुक्यात शेतात मशागत करण्यासाठी झाडांची पाने व फांद्या तोडून शेतात राब पेटविण्यासाठी अंथरलेले असताना या अवकाळी पावसाने हे राब भिजविल्यास मशागत खोळंबते.

आंबा बागायतदार शेतकऱ्यांना आधीच उशिरापर्यंत लांबलेल्या पावसामुळे मोहोर उशिरा लागल्याची चिंता असताना तापमानवाढीमुळे आंबा पिक चांगले येण्याची शक्यता निर्माण झाली होती, मात्र अवकाळी पावसाने आंब्यासह कोकम आणि काजूबोंडाचे सडे झाडाभोवती पडून बाजारात करवंद, बोरं, तोरणं आदी रानमेवा टोपलीत घालून विकण्यास आणणाऱ्या आदिवासी समाजाची निराशा आंबा उत्पादक शेतकऱ्याप्रमाणेच होत असते. मागील काही अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये सरकारने आंबा बागायतदारांना अंशत: नुकसान भरपाई देण्याची भूमिका घेतली गेली असताना आता अधिक स्वरूपात नुकसान झाल्यास मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये याबाबत निर्णय होण्याची अपेक्षा आहे. येत्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्याला अवकाळी पावसामुळे होणारी निराशा टाळण्यासाठी पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांतील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नैसर्गिक आपत्तीने अथवा वणव्यांनी आंबा पिक अथवा रोपांचे नुकसान झाल्यास विमा असो अथवा नसो, शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्याचा निर्णय घेण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्यात दोन वर्षांपूर्वी धानपिक नुकसान भरपाईसाठी महसूल यंत्रणा व तालुका कृषी कार्यालयामार्फत संयुक्त नुकसान भरपाई सर्वेक्षण आढावा घेऊन अहवाल तयार करण्यात आला होता. यानुसार अनेक शेतकऱ्यांना एका सातबारासाठी तसेच झाडासाठीदेखील खात्यावर थेट रक्कम अथवा धनादेश जमा करण्यासाठी देण्यात आले होते. काही वर्षांपूर्वी पोलादपूर तालुक्यातील ३८४.५० हेक्टर आंबा पिकाखालील क्षेत्रापैकी एक हजार ६७१ शेतकरी खातेदारांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले. यामध्ये हवामानावर आधारित पिकविमा उतरविलेले ४४ शेतकरी असून त्यांचे १५.१६ हेक्टर क्षेत्र पिकविमा उतरविलेले आहे. यासाठी सुमारे ९० हजारांहून अधिक विमा हप्ता रक्कम शेतकऱ्यांनी भारतीय आयुर्विमा महामंडळाला हप्त्यापोटी दिली होती. त्यानुसार १५ लाख ६० हजार रूपये एकूण संरक्षित रकमेचा लाभ होणे अपेक्षित असताना या आंबापिक नुकसानीपोटी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पोलादपूर शाखेतर्फे १९ आंबा उत्पादक शेतकरी, युनियन बँक ऑफ इंडियाच्या पोलादपूर शाखेतर्फे सहा शेतकरी आणि बँक ऑफ इंडियाच्या पैठण शाखेकडून एक विमासंरक्षित शेतकरी यांना संरक्षित रक्कम अदा करण्यात आली, परंतू बँक ऑफ इंडियाच्या पोलादपूर शाखेतील खातेदार शेतकऱ्यांना गेल्या दीड महिन्यापासून आंबा झाडांच्या फळांचे गेल्यावर्षी झालेल्या नुकसानीपोटी एकूण चार लाख सहा हजार ३८० रूपये खातेदारांच्या खात्यावर जमा करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे उघडकीस आले होते.

यंदा असंख्य शेतकऱ्यांनी हवामानावर आधारित पिकविमा उतरविण्यापूर्वीच बँकांच्या मनमानीच्या अनुभवामुळे चालढकल केली असल्याचे दिसून आले. यामुळे या शेतकऱ्यांना बँकांच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी धोरणावर नाराजी व्यक्त करण्याचा चांगलाच फटका बसला असून राज्यसरकारने कोकणातील आंबा पिक उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईसाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे.

गेल्यावर्षीदेखील वादळी पावसामुळे पोलादपूर तालुक्यातील ८७ पैकी ३७ गावांमधील शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून यामध्ये ३५ गावातील शेतकरी आंबा उत्पादक असल्याचा प्राथमिक अंदाज पोलादपूर तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडून तयार करण्यात आलेल्या अहवालामध्ये व्यक्त केला आहे.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन व्यग्र असताना या अवकाळी पावसामुळे गावोगावी जाऊन पंचनामे करताना फार मोठ्या अडचणींना कृषी विभागाच्या पर्यवेक्षक, सहायक आणि कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागले असून पर्जन्यमान कमी आणि जोरदार वादळ या पार्श्वभूमीवर आंबा उत्पादक शेतकऱ्यांना एकूण हेक्टरी नुकसानीच्या ३० टक्क्यांवरील नुकसान गृहित धरण्यात आले असून काही ठिकाणी नजर पंचनामे करण्यात आल्याचीही माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील एकूण ५३.२१ हेक्टरमधील १५५ आंबा उत्पादक तर ३ भाजीपाला उत्पादक शेतकरी अवकाळी पावसाने बाधित झाले असून चार लाख ७८ हजार ८९० रूपयांच्या हानीचा प्राथमिक अंदाज प्राप्त झाला. झाडावरून काळजीपूर्वक काढलेले आंबे आणि फणस शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी आल्यानंतर भाव वाढण्याची शक्यताही या व्यापाऱ्यांकडून वर्तविण्यात आली आहे. तालुक्यातून दररोज सायंकाळी वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केटमध्ये आंबा आणि फणसांची दरवर्षी मोठया प्रमाणात निर्यात करण्यात येत असते.

यंदा वातावरणामध्ये मोठ्या प्रमाणात उष्मा पसरला असून यामुळे आर्द्रतेत वाढ होऊन अवकाळी पावसाची शक्यता अधिक असल्याने आंबा पिकाचे संरक्षण करण्याची वेळीच गरज आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेजला रिप्लायही देणार चॅटजीटीपी

व्हॉट्सअ‍ॅप मीडिया प्लॅटफॉर्म आहे. हे मेटाच्या मालकीचे आहे. यावरून तुम्ही एकमेकांशी संवाद साधू शकता. एकमेकांना फोन करू शकता, आपले फोटोज स्टेटसला पोस्ट करू शकता. मात्र कधी कधी दिवसभराच्या कामांमुळे तुम्ही थकलेले असता आणि तुमच्या व्हॉट्सअ‍ॅपवर भरपूर मेसेज आलेले असतात पण थकल्यामुळे तुम्हाला त्याचा रिप्लाय देण्याची इच्छा नसते. आता तुम्हाला हे करण्याची गरज पडणार नाही करणं आता तुमचे रिप्लाय देण्याचे काम हे चॅटजीटीपी करणार आहे.



आता व्हाट्सअ‍ॅपचे रिप्लाय देण्यास मदत करणार आहे. तुम्ही आता Github द्वारे चॅटजीपीटीला व्हॉट्सअ‍ॅपसह एकत्रित करू शकता. सोप्या भाषेत सजून घ्यायचे झाले तर तुम्ही चॅटबॉट ला Github च्या माध्यमातून व्हॉट्सअ‍ॅपमध्ये आणू शकता.

सॉफ्टवेअर डेव्हलपर असलेल्या डॅनियल ग्रॉस याने पायथन स्क्रिप्ट (कोडिंग नोट ) तयार केली आहे. ज्याच्या मदतीने तुम्ही व्हाट्सअ‍ॅपसह चॅटजीपीटी एकत्रित करू शकता. हे करण्यासाठी तुम्ही पहिल्यांदा पहिल्यांदा वेबवरूनच सर्व आवश्यक भाषेच्या फाईल्स डाउनलोड करा. सर्व फाईल्स डाउनलोड केल्यानंतर तुम्हाला WhatsApp-gpt-main हा फोल्ड ओपन करावा लागेल आणि server.py ho डॉक्युमेंट ॲक्टिव्हेट करावे लागेल. इथून चॅटजीपीटी आणि व्हाट्सअ‍ॅपचे एकत्रीकरण होईल. सर्व्हरसुरु झाल्यानंतर तुम्हाला खड असे टाईप करावे लागेल आणि एंटर करावे लागेल. यानंतर python server.py da क्लिक करावे लागणार आहे. असे केल्यामुळे तुमचा मोबाईल नंबर OpenAI च्या चॅटपेजवर रजिस्टर होईल. यंततर तुम्ही हे कन्फर्म केले की, तुम्हाला GPT व्हॉट्सअ‍ॅपवर Open AI चे चॅट दिसेल.

जे लोक आपल्या कामामध्ये व्यस्त आहेत किंवा AI च्या संभाव्यतेमध्ये खोलवर जाऊ इच्छितात ते ही पद्धत वापरून पाहू शकतात. हा चॅटबॉट इतका सोपा आणि सामान्य प्रतिसाद देतो की समोरच्या व्यक्तीला हे कळणार नाही कि मेसेज तुम्ही केला आहे की AIने, मात्र एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे इंटरनेटवर चॅट जीपीटीच्या नावाने अनेक प्रकारचे ॲप्लिकेशन्स, सॉफ्टवेअर, लिंक्स इत्यादी उपलब्ध आहेत. त्यामुळे डाउनलोड करताना त्याबद्दलचे सर्व तपशील खरे आहेत की नाहीत हे तपासून पाहणे आवश्यक आहे. ओपनआयने अद्याप कोणतेही चॅट जीपीटी ॲप जारी केलेले नाही किंवा मेटाने त्याच्या ॲप्समध्ये अशी कोणतीही सेवा कनेक्ट केलेली नाही.

# अभिनय सम्राट डॉ. काशिनाथ घाणेकर

**निमित्त**



डॉ. काशिनाथ घाणेकर हे मराठी नाट्यअभिनेते व हिंदी–मराठी चित्रपट अभिनेते होते. सन १९६० ते १९८० या काळातले ते मराठीतले पहिले सुपरस्टार होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्याबद्दल जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

स्त्रीरोगतज्ज्ञ इरावती कर्णिक या काशिनाथांच्या पहिल्या पत्नी होत. त्यांच्याशी घटस्फोट घेतल्यावर काशिनाथ घाणेकर यांनी अभिनेत्री सुलोचनाबाईंची कन्या कांचन लाटकर यांच्याशी लग्न केले. कांचन घाणेकरांनी स्वतःच्या वैवाहिक सहजीवनावर ‘नाथ हा माझा’ नावाचे पुस्तक लिहिले आहे. अभिनय सुरू करण्याआधी घाणेकर व्यवसायाने दंतवैद्य होते. काशीनाथ घाणेकर यांचा जन्म १४ सप्टेंबर १९३२ रोजी चिपळूण येथे झाला आणि तिथेच त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

आपल्याच नजरेत आपले आदरयुक्त व्यक्तित्व उभारण्याच्या अट्टाहासापोटी आयुष्याच्या शेवटपर्यंत झगडणारे, वैद्यकीय व्यवसायाद्वारे समाजात इज्जत मिळवून सत्कारयुक्त जीवन जगण्याऐवजी रंगमंचावर आपले श्वास शोधणारे, मराठी रंगभूमीवरचा सुपरस्टार होऊनही वडिलांच्या कौतुकाच्या शब्दासाठी पात्र न ठरणारे आणि ते दु:ख आयुष्यभर कवटाळून रंगमंचावर अवतरल्यानंतर मिळणार्या टाळ्या आणि शिट्ट्यांच्या धुंदीत आपले आयुष्यच उधळून लावणारे, असे त्यांच्या व्यक्तित्वाचे धागे भल्याबुर्या व कुरुपतेच्या सर्व रंगांसह विणले गेले. डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी आपल्या आयुष्याची क्षणभंगुरता आपल्या परीने याच निरर्थक हातवारे आणि तुर्रेबाजीने आपल्या परीने अर्थपूर्ण बनवली. त्यांचे अस्तित्व त्या रंगभूमीवर वावरण्याभोवती होते आणि त्यांचे प्राण समोरच्या गर्दीत होते.

सन १९६० ते १९८० या कालावधीत काशिनाथ हे मराठी नाट्य–चित्रसृष्टीचे पहिले सुपरस्टार होते आणि त्याकाळात ते सर्वात जास्त मानधन घेणारे अभिनेते होते. दादी माँ या १९६६ साली निघालेल्या हिंदी चित्रपटात काशिनाथ घाणेकर यांनी अशोक कुमार आणि बीना रॉय यांच्या मुलाची एक छोटी भूमिका केली होती. वसंत कानेटकर यांनी लिहिलेल्या ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ या नाटकातल्या संभाजी महाराजांच्या भूमिकेनंतर घाणेकरांना अफाट लोकप्रियता लाभली. या नाटकाशिवाय त्यांनी इतर अनेक नाटकांमध्ये उत्तम अभिनय केला.

सन १९६८ मध्ये निघालेल्या ‘मधुचंद्र’ या मराठी चित्रपटापासून काशीनाथ घाणेकर मराठी चित्रपटसृष्टीतील एक मोठे अभिनेते बनले. नाटक रंगमंचावर पहिली शिट्टी पडली ती काशिनाथ घाणेकर यांना. ज्यांच्या प्रवेशानेच टाळ्यांच्या कडकडाटात नाट्यगृहे दणाणून जात होती. त्यांच्या नावाने मराठी रसिकांना अक्षरश: वेड लावले होते.

मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टीमध्ये डॉ. काशिनाथ घाणेकर यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांनी मराठी व्यावसायिक रंगभूमीला वैभवाचे दिवस आणले, अनेक तरुण अभिनेत्यांसाठी ते प्रेरणादायी ठरले. प्रभावशाली संवादफेक, जरब बसणारे डोळे आणि विशिष्ट पद्धतीने बोलण्याची त्यांची शैली अद्वितीय होती.

‘रायगडाला जेव्हा जाग येते’, ‘इथे ओशाळला मृत्यू’, ‘अश्रूंची झाली फुले’, ‘गारंबीचा बापू’, ‘आनंदी गोपाळ’, ‘शितू’, ‘तुझे आहे तुजपाशी’, ‘सुंदर मी होणार’, ‘मधुमंजिरी’ या आणि अशा अनेक नाटकांमधील त्यांच्या भूमिका जबरदस्त गाजल्या. ,‘देवमाणूस’,‘पाठलाग’,‘मधुचंद्र’,‘सुखाची सावली’,‘मानला तर देव’, या मराठी चित्रपटांमध्येही त्यांनी अभिनय केला. अशा या महान अभिनय सम्राटाचे २ मार्च १९८६ रोजी निधन झाले.

**(साभार : मायमहानगर)**

**क्लिक...क्लिक...!**




**पनवेल : उन्हाची चाहूल लागताच गरीबांचा फ्रीज म्हणून ओळखला जाणारा माठ सध्या शहरात अनेक ठिकाणी विक्रीसाठी ठेवला आहे.**

## आरोग्य प्रहर

# हाता-पायाला सतत घाम येणे ‘हे’ त्यामागचे कारण

उन्हाळ्यात व्यायाम करताना किंवा जास्त शारीरिक हालचाली करताना घाम येणे अपरिहार्य असते. पण, काहीही न करता नुसतं बसूनही घाम येऊ लागला, तर सतर्क होण्याची गरज आहे. विशेषत: हातापायाच्या तळव्यांना सारखा घाम येत असेल तर विशेष लक्ष दिले पाहिजे. हे जगभरातील अनेक लोकांसोबत घडते. या समस्येला हायपरहायड्रोसिस म्हणतात. लोक सहसा याबद्दल चिंतेत असतात. अशा वेळी अस्वस्थता, लाजिरवाणेपणा यासारख्या समस्या पीडित व्यक्तीमध्ये दिसून येतात.



**सामान्यत** : शरीर घामाद्वारे तापमान नियंत्रित करण्याचा प्रयत्न करते, परंतु हायपरहायड्रोसिसने ग्रस्त लोकांना हिवाळ्यातही हाता–पायांनाही घाम येत असतो.

**हायपरहायड्रोसिसची लक्षणे –** जर तुमच्या हाताच्या आणि पायाच्या तळव्यांना नेहमी घाम येत असेल आणि तुम्हाला याचे कोणतेही कारण समजत नसेल तर ते हायपरहायड्रोसिसचे लक्षण आहे. तुम्हाला कोणत्याही ऋतूमध्ये किंवा कोणतीही शारीरिक हालचाल न करताही घाम येत असेल, तर तुम्ही सतर्क राहण्याची गरज आहे. हायपरहायड्रोसिसची बहुतेक प्रकरणे तळवे, तळवे आणि अंडरआर्म्सशी संबंधित आहेत.

**कधी रहावे अधिक सतर्क?** –जेव्हा सतत घाम येत असतो तेव्हा शरीरात इतर अनेक लक्षणेदेखील दिसू लागतात, ज्यावरून त्याचे गांभीर्य दिसून येते. उदाहरणार्थ, जास्त घाम येत असेल, छातीत दुखत असेल आणि उलट्या होणे, अशा समस्या असतील तर अशा परिस्थितीमध्ये पूर्ण सतर्क राहून लवकरात लवकर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**स्वेट ग्लँड्स असतात कारणीभूत –** आता हे का घडते ते समजून घेऊ. शरीराचे तापमान नियंत्रित करणे, हे घामाचे कार्य आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, आपल्या शरीरातील स्वेट ग्लँड्स म्हणजेच घामाच्या ग्रंथी या घाम सोडतात. शरीरातील एक नर्व्ह ही या ग्रंथीला घाम (सोडण्याचे) निर्देश देते. पण जेव्हा स्वेट ग्लँड अतिक्रियाशील असते तेव्हा जास्त घाम येऊ लागतो. या स्थितीला हायपरहायड्रोसिस असे म्हणतात. मात्र हायपरहायड्रोसिसचे नेमके कारण अद्याप निश्चित झालेले नाही.

या व्यतिरिक्त, असे (सतत घाम येणे) होण्यामागे इतर अनेक कारणे असू शकतात. मधुमेह, लो ब्लड शुगर, विशिष्ट प्रकारचे कॅन्सर, हृदयविकाराचा झटका येणे, एखादा संसर्ग आणि थायरॉईडचा त्रास असेल तर त्यावेळीही सारखा घाम येण्याची समस्या उद्भवू शकते. बऱ्याच प्रकरणांमध्ये हा रोग अनुवांशिकपणे पिढ्यानपिढ्या (चालत) आलेला दिसून येतो.

# डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा स्वच्छतेचा जागर

## पालीत श्री सदस्यांनी सुमारे ३३ टन कचऱ्याची विल्हेवाट



**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सुधागड पालीत स्वच्छता मोहीम करण्यात आली. स्वच्छता मोहीम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'स्वच्छ भारत अभियानाचे' महामोहीम राज्यपालांनी नियुक्त केलेले स्वच्छता दूत डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे रेवदंडा यांच्यामार्फत प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी, राहुल दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्वच्छता मोहीम करण्यात आली.

पाली येथे घेण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात बल्लाळेश्वर मंदिर परिसर, शासकीय कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्र,बसस्थानक, तहसील कार्यालय, दिवाळी न्यायालय, पोलीस स्टेशन, कृषी खाते व वन विभाग, बांधकाम विभाग व शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, पाली बाजारपेठ, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, हटाळेश्वर चौक परिसराची श्रीसदस्यांनी स्वच्छता केली. सकाळी ८ वाजल्यापासून स्वच्छता अभियानाला सुरुवात केली.

अभियानात १३०० श्रीसदस्यांनी सहभाग घेऊन हातात ग्लोज, झाडू, खुराल, पंजे यांचा वापर करून हे अभियान यशस्वी केले. या वेळी पालीतून १७.६५ टन सुका कचरा आणि १५.२ टन ओला कचरा जमा करून ट्रॅक्टर, टेम्पो यांच्या माध्यमातून डम्पिंग मैदानात साठविण्यात आला.

**प्रतिष्ठानमार्फत समाजप्रबोधन, स्वच्छता, व्यसनमुक्ती असे अनेक स्तुत्य उपक्रम हाती घेऊन श्री सदस्य मोठ्या उस्फुर्तपणे निस्वार्थ कार्य करीत असतात. स्वछता मोहीम राबविल्याने गाव, परिसर स्वच्छ होऊन नागरिकांचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत होणार आहेत.**

**–जितेंद्र गद्रे, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष**

# पोलादपूरात भाजपच्या महिला मोर्चातर्फे आरोग्य शिबीर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चातर्फे पोलादपूर शहरातील हिंदहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त ५ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अपोलो हॉस्पिटलच्या सौजन्याने महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या अध्यक्षा उज्वला मराठे–शेठ आणि तालुका अध्यक्ष प्रसन्ना पालांडे तसेच शहरअध्यक्ष राजा दिक्षित यांनी दिली.

अपोलो हॉस्पिटलच्या सौजन्याने संपूर्ण रक्त तपासणी, नेत्र तपासणी, रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, बोन मिनेरल डेन्सीटी आणि ब्रेस्ट कॅन्सरची प्रिव्हेंटल टेस्ट आदी तपासण्या यावेळी निशुल्क करण्यात येणार आहेत. महिलांना आरोग्य तपासणी करताना आधारकार्डची झेरॉक्स सोबत घेऊन यावे.


## दैनिक रामप्रहर

**वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन**

(सेंट्रल रूल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**प्रकाशन स्थळ :** अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित

**प्रकाशनाचे कालमान :** दैनिक

**मुद्रकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.

**प्रकाशकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.

**संपादकाचे नांव :** देवदास लक्ष्मण मटाले

**राष्ट्रीयत्व :** भारतीय

**पत्ता :** टॉवर ५, फ्लॅट नं. ६४, गोदरेज गार्डन इन्क्लेव्ह, विक्रोळी (पूर्व), मुंबई – ४०० ०७९

मी **कृष्णा चांगू ठाकूर** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

दि. ०२ मार्च २०२३

**सही/–**
**कृष्णा चांगू ठाकूर**
**(प्रकाशकाची सही)**


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026390** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-4/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Tambati Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD Amount:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.03.2023, 18:00 Hrs to 09.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 09.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 10.03.2023 at 11:00 Hrs.(if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# पैशांचा पाऊस पाडण्यासाठी पाच लाख दिले; गुन्हा दाखल

## भोंदू महाराज पैशांसह गायब

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील हॉटेल फूड कोर्ट येथे पैशाचा पाऊस पाडण्यासाठी खोपोली येथील एका तरुणाने तब्बल पाच लाखाची रक्कम नाव गाव माहिती नसलेल्या भोंदू महाराज आणि त्याच्या चार साथीदारांना दिली होती. मागील एक वर्षात हा व्यवहार पूर्ण झाला असून त्याबाबत आता कर्जत पोलीस ठाणे येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

खोपोली येथील शिळफाटा भागात बिल्डिंग मटेरियल सप्लायचा व्यवसाय करणारी एका तरुणाने पैशांच्या हव्यासापोटी पैशाचा पाऊस पडणाऱ्या भोंदू महाराजाला जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२या कालावधीत तब्बल पाच लाखाची रक्कम दिली. हा सर्व व्यवहार कर्जत येथील हॉटेल फूड कोर्ट येथे झाला असून खोपोली शिळफाटा येथील तरुणाना ही रक्कम सज्जन महाराज, त्याचा साथीदार सुरज आणि तीन अनोळखी व्यक्तींकडे दिले. वर्षभरात एकदाही पैशाचा पाऊस पडला नाही आणि त्याचे पैसे तीन पट म्हणजे सज्जन महाराज आणि त्याच्या गँगला दिलेले पाच लाखाचे पंधरा लाख काही झाले नाही आणि आपण फसलो आहोत. याची खात्री झाल्यानंतर कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद झाला आहे. कर्जत पोलीस ठाणे येथे सज्जन महाराज त्याचे साथीदार सूरज तसेच अन्य तीन अनोळखी व्यक्ती या सर्वांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्या तिघांवर खोपोली शिळफाटा येथील तरुणाची फसवणूक केल्याप्रकरणी भादवी कलम ४०६, ४१७, ४२०, ३४ नुसार गुन्हा ३५ / २०२३ नुसार पोलीस हवालदार समीर भोईर अधिक तपास करीत आहेत. घटनेची माहिती घेण्यासाठी प्रभारी पोलीस अधिकारी राजेंद्र तेंडुलकर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांच्यासह हॉटेल कर्जत फूड कोर्टची पाहणी केली आहे.

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026392** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-6/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Apta Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD Amount:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.03.2023, 18:00 Hrs to 09.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 09.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 10.03.2023 at 11:00 Hrs.(if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# विज्ञान मेळाव्यात गुंतले बालवैज्ञानिक



**पाली : प्रतिनीधी**

विज्ञान दिनाचे औचित्य साधून नेणवली शाळेमध्ये गटशिक्षणाधिकारी साधूराम बांगारे व केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पहिली ते पाचवी आणि सहावी ते सातवी गटांमध्ये विविध स्पर्धा घेण्यात आल्या. नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा नेणवली येथे असल्याने प्रयोगशाळेतील सर्व प्रयोग परिसरातील सर्व विद्यार्थीना, नागरिकांना पाहता यावेत यासाठी या विज्ञानदिनी विज्ञान मेळा आयोजन शाळा स्तरावर करण्यात आले होते. याचबरोबर इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या विज्ञान पाठ्यपुस्तकांतर्गत छोटे प्रयोग व कृती, घरगुती व टाकाऊ साहित्य वापरून हे हे प्रयोग सादरीकरण केले. विज्ञानदिनी शाळा व्यवस्थापन समिती नेणवलीने मेळाव्यास भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या वेळी विज्ञान प्रदर्शनही भरविण्यात आले होते या संपूर्ण कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष हरपाल, उपशिक्षक राजेंद्र अंबिके, गणपत वरगडे, श्रीहरी धुळगुंडे यांनी नियोजन केले.

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026391** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-5/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Wadkhal Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD Amount:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.03.2023, 18:00 Hrs to 09.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 09.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 10.03.2023 at 11:00 Hrs.(if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026394** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-7/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Uran Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD Amount:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.03.2023, 18:00 Hrs to 09.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 09.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 10.03.2023 at 11:00 Hrs.(if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026377** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-1/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of vehicle at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD Amount:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.03.2023, 18:00 Hrs to 09.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 09.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 10.03.2023 at 11:00 hrs.(if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026379** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-3/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Taloja Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD Amount:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.03.2023, 18:00 Hrs to 09.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 09.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 10.03.2023 at 11:00 Hrs.(if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026378** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-2/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV ONGC Panvel Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD Amount:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.03.2023, 18:00 Hrs to 09.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 09.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 10.03.2023 at 11:00 Hrs.(if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email :- mahad.ee@mahapwd.gov.in  Ph. No. (02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक ९१ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन – ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी–१ नमुन्यातील निविदा ई– निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रामा– १३९ कि.मी. ०/०० ते २४/२०० मध्ये वाहतुक सुरक्षेच्या उपाययोजना करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (रस्त्याची विशेष दुरुस्ती) | ८९२३२४०/– | ९०,०००/– | १,१८०/– | १२ महिने |
| २ | पोलादपुर देवपूर गोळेगणी कुडपण रस्ता प्रजिमा– ७१ कि.मी. ०/०० ते २०/०० मध्ये वाहतुक सुरक्षेच्या उपाययोजना करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (रस्त्याची विशेष दुरुस्ती) | ९५८५१५५/– | ९६,०००/– | १,१८०/– | १२ महिने |
| ३ | कापडे पितळवाडी बोरघर कामथे रस्ता प्रजिमा– १०१ कि.मी. ०/०० ते २२/०० मध्ये वाहतुक सुरक्षेच्या उपाययोजना करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (रस्त्याची विशेष दुरुस्ती) | ९०७८७९८/– | ९१,०००/– | १,१८०/– | १२ महिने |
| ४ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रामा–१३९ कि.मी. १८/७०० मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे, तालुका पोलादपूर जिल्हा रायगड (रस्त्याची विशेष दुरुस्ती) | ६२७६९६३/– | ६३,०००/– | १,१८०/– | १२ महिने |
| ५ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रामा – १३९ कि.मी. २१/८०० ते २२/२०० मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (रस्त्याची विशेष दुरुस्ती) | ६६२५८५९/– | ६७,०००/– | १,१८०/– | १२ महिने |

**ई निविदेचे वेळापत्रक**

अल्प कालावधी निविदा सुचना, शासन निर्णय क्र. संकीर्ण– २०२२/प्र.क्र १०४/ इसा–२,, मंत्रालय मुंबई दि.०८/०२/२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०२/०३/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१०/०३/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जि. रायगड यांचे कार्यालयात दिनांक **१३/०३/२०२३ वेळ १२.०० वाजता** |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/९४८**
**दिनांक : २८/०२/२०२३**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# खोपोलीत मराठी भाषा दिन साजरा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शाखेच्या अध्यक्ष ज्येष्ठ कवयित्री उज्वलाताई दिघे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मराठी भाषा दिन कार्यक्रमात वसंत देशमुख मेमोरियल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष उल्हासराव देशमुख, के.एम.सी. महाविद्यालयाचे डॉ. भाऊसाहेब नन्नावरे, अल्टा लॅबोरोटरीजचे जनरल मॅनेजर बी. एस. म्हात्रे यांनी उपस्थित रसिकांशी संवाद साधला. प्रकाश राजोपाध्ये, कवयित्री रेखा कोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**पनवेल महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**जाहीर ई–निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/३४२२/प्र.क्र.०१/४९४/२०२३          दिनांक : १/०३/२०२३

**शुध्दीपत्रक**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/१०४/२०२२–२३ | पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती–ड, प्रभाग क्र. १९ मधील अं. भू.क्र. १९३ मध्ये रोज बाजार विकसीत करणे. | ६,८७,३८,७२५/– |

या कामाच्या ई–निविदेच्या शुध्दीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.०२/०३/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त–I**
**पनवेल महानगरपालिका**

## निवडक



### वीर वाजेकर कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर कॉलेजमध्ये ग्रंथालय विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल येथील सुप्रसिद्ध गझलकार ए. के. शेख यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी प्राचार्य पी. जी. पवार, मराठी विभाग प्रमुख गजानन चव्हाण व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. प्रदर्शनात ग्रंथालयात नव्यानेच दाखल झालेली पुस्तके तसेच साहित्य अकादमी पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार, साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार व बालसाहित्य पुरस्कार ज्या पुस्तकांना मिळालेला आहे अशी पुस्तके पाहण्यासाठी उपलब्ध होती.

### विमला तलाव येथे मराठी भाषा दिन



**उरण :** ज्ञानपीठ पारितोषिक विजेते विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्म दिनाचे औचीत्त साधून शासना तर्फे मराठी भाषा दिन सोमवारी (दि. २७) उरण नगर परिषदेचे मॉ साहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालय विमला तलाव येथे मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. या वेळी मॉ साहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयाचे सहाय्यक ग्रंथपाल जयेश वत्सराज, ज्येष्ठ साहित्यिक रायगडभूषण श्रीधर पाटील, के. बी. चौधरी, रजत रंजन, मुहमद यासिर नझीरी, ऋची गुप्ता, अदिना भाईजी, शुभम चौडदाब, ज्ञानेश्वर कदम, वाचक वर्ग आदि उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी घेतली सापांविषयी माहिती



**पनवेल :** पिल्लई एच.ओ.सी.कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजि,रसायनी यांच्या एन एस एस कॅम्पमधील विद्यार्थ्यांना फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) संस्थेच्या वतीने शून्य सर्पदंश मृत्यू अभियान अंतर्गत सापांविषयी माहिती देण्यात आली. यासोबत क्लायमेट चेंजचा सजीवसृष्टीवर होणारा परिणाम, पर्यावरण आणि जैवविविधता याविषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमासाठी रायगड भूषण जयवंत ठाकूर, निकेतन ठाकूर, राकेश शिंदे, प्रथमेश मोकल, तुषार कांबळे आदी उपस्थित होते.

### बिरमोळे हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिर

**पनवेल :** शहरातील सिटीझन्स युनिटी फोरम व बिरमोळे मेडिकल फाउंडेशन ट्रस्ट या सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने बिरमोळे हॉस्पिटल येथे आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात १०५ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरामध्ये पनवेल मधील नामांकित डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. डॉ. केजरीवाल, डॉ. पूजा पारधी, डॉ. अहमद तारीग, डॉ. रुचा साने, डॉ. धांडे या निपुण डॉक्टरांनी शिबिरार्थींना मोलाचे मार्गदर्शन केले. कफचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच कांचन पुजारी, प्राजक्ता वातेरे, सुरेखा मयेकर व हॉस्पिटलमधील इतर कर्मचारी यांनी शिबिरासाठी मेहनत घेतली. गेली २० वर्षे दरवर्षी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या या शिबिरास पनवेल नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

### 'रोटरी'तर्फे मोफत आरोग्य तपासणी



**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने शेडुंग येथील अमोल ऑटोमोबाईल पेट्रोलपंपावरील कामगार आणि आजूबाजूच्या गावातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत आवश्यक औषधांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर शंकरा आय हॉस्पिटलच्या वतीने मोफत डोळ्यांची तपासणी करण्यात आली. या उपक्रमात क्लबचे मार्गदर्शक आणि पनवेल मधील नामवंत सर्जन डॉ. गिरीश गुणे, डॉ. संजिवनी गुणे, डॉ. लक्ष्मण आवटे, डॉ. राजेश गांधी, डॉ. अमोद दिवेकर, डॉ. अभय गुरसळे, डॉ. जया गुरसळे, डॉ. सुधा भगत, डॉ. मिलिंद घरत, डॉ. रोहिणी घरत, डॉ. तुषार जोशी या पनवेलमधील नामवंत डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली.

### विद्युत साहित्याची चोरी

**पनवेल :** जवळील पुष्पकनगर येथून विद्युत साहित्याची चोरी झाल्याची घटना घडली असून जवळपास १४ लाख रुपये किमतीचे साहित्य चोरीस गेले आहे. पुष्पकनगर सेक्टर ६ येथील सिडको सबस्टेशनच्या कंपाऊंडमधून व सबस्टेशनमधून अॅल्युमिनीयमच्या तारा, टॉवरच्या बॅटरी असा जवळपास १४ लाख रुपयांच्या साहित्याची चोरी झाली आहे. याविषयी शहर पोलीस स्टेशनमध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे.

# शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश





**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बेलापूर विधानसभा मतदारसंघातील विविध पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी उपनेते विजय नाहटा यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

नेरूळ येथील शिवसेना पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पक्ष सोहळ्यावेळी माजी उपमहापौर अशोकराव गावडे, नवी मुंबई संपर्क प्रमुख किशोर पाटकर, महिला संपर्क प्रमुख दमयंती आचरे, महिला जिल्हा संघटक शितलताई कचरे, महिला जिल्हा संघटक सरोजताई पाटील, शहरप्रमुख सुरेश भिल्लारे, शहरसंघटीका सुरेखा गव्हाणे, प्रियांकाताई गाडे, उपजिल्हाप्रमुख रामाशेठ वाघमारे, नवी मुंबई सहसंपर्क प्रमुख सचिन कांबळे, उपजिल्हा प्रमुख अजय पाटील, माजी सैनिक सेनेचे जिल्हा संघटक सुरेश काकडे, अल्पसंख्याक सेलचे नवी मुंबई जिल्हा संघटक बरनोडशहा नाडर, दुधभाते आदी उपस्थित होते.

महिलांकडे योग्य नियोजन असते, त्यांच्याकडे संघटन कौशल्य असते. पक्ष संघटन विस्तार होण्यास महिलांच्या अंगभूत गुणांची मोठ्या प्रमाणात मदत होते शिवाय महिलांच्या विविध योजना असून त्याचा लाभ घेऊन आर्थिक सक्षम होण्यासाठी राजकारणात महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी बोलताना सांगितले. तरुणाई उद्याचे भविष्य आहे त्यांनी पुढे येऊन विविध विधायक कार्यक्रम राबवून शिवसेना पक्षाची पताका उंचावत ठेवावी महिला आणि तरुणांना सोबत आम्ही खंबीरपणे उभे आहोत असे उपमहापौर अशोकशेठ गावडे यांनी सांगितले. या वेळी मोठ्या संख्येने शिवसैनिकानी गर्दी केली होती.

## तुर्भे येथे गढूळ पाण्याचा पुरवठा

**नवी मुंबई : बातमीदार**

मागील काही दिवसांपासून तुर्भे स्टोर परिसरातील नागरिकांना नळाद्वारे दूषित पाणीपुरवठा होत असून पाण्यातून चक्क जंतू, किडे येत आहेत. हे पाणी प्यायल्याने काही नागरिकांना जुलाबाचा त्रास होऊ लागला.

तुर्भे स्टोर परिसरात चार-पाच दिवसांपासून गढूळ पाण्याचा पुरवठा होत असताना आता चक्क नळातून किडे आणि जंतू बाहेर पडू लागले आहेत. तुर्भेमध्ये जलवाहिन्या, मलनिस्सारण वाहिन्या तसेच गटाराचे योग्य नियोजन नाही. उघड्या गटारालगत असलेल्या जलवाहिनीला गळती असल्याने दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. हे पाणी प्यायल्याने नागरिकांना जुलाबाचा त्रास होत असल्याचे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नवी मुंबई महापालिका पाणी पुरवठा विभागामार्फत योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## भिंगार येथे आपत्ती व्यवस्थापनाकडून मॉक ड्रील

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

एचपीसीएलमध्ये सुरक्षितता सर्वोपरी आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळणेची तयारी तसेच विविध सरकारी एजन्सी आणि जिल्हा प्रशासनाच्या प्रतिसादाची पुष्टी करण्यासाठी एचपीसीएलच्या मुंबई पुणे सोलापूर पाइपलाइन आणि उरण चाकण शिक्रापूर पाइपलाइनने संयुक्तरीत्या एमपीएसपीएल चेनेज ४२.२ किमी येथे आपत्कालीन प्रतिसाद आणि आपत्ती व्यवस्थापन योजनेनुसार ऑफसाइट मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले होते.



या ऑफसाइट मॉक ड्रिलचे निरीक्षण मोहन भोरे (विभागीय आयुक्त, आपत्कालीन नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन, नवी मुंबई) आणि अजित मोहिते उपसंचालक कारखाना यांनी केले. या रंगीत तालिममध्ये गेल इंडिया, रिलायंस कंपनीच्या अधिकार्यांनी देखील म्यूचुअल ऐड मेंबर म्हणून सक्रिय सहभाग घेतला. शासकीय रुग्णालय अजिवली, रसायनी पाताळगंगा परिसरातील अधिकारी आणि पोलीस ठाण्याचे प्रतिनिधीही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

ऑफसाइट ड्रिलचे नेतृत्व अरविंद चौहान, घटना नियंत्रक (डीजीएम एमपीएसपीएल वाशी) यांनी मुख्य घटना नियंत्रक भरतम गोपाल यांच्या मार्गदर्शनाखाली केले. सर्व दलाच्या प्रमुखांनी म्हणजे अग्निशमन दल, बचाव पथक, देखभाल दल आणि सहाय्यक दल आणि त्यांच्या संबंधित सदस्यांनी वेळेवर आणि प्रक्रियेनुसार घटना नियंत्रकाशी उत्कृष्ट समन्वय साधून ऑफसाइट मॉक ड्रिल यशस्वीरीत्या पार पाडले.

एचपीसीएलचे इतर वरिष्ठ अधिकारी अनिल देवनानी, गिरीश राऊत, सी रोहित, सचिन गायकवाड, विवेक दिनकर, नितेश मीना, कुश गर्ग, अंकित ठाकूर आदींनी या ऑफसाइट मॉक ड्रिलमध्ये सक्रिय सहभाग सहभाग घेतला होता.

## मराठी भाषा दिनानिमित्त नवी मुंबईत स्वाक्षरी मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिनाचे दिनाचे औचित्य साधून जुई नगर मनसे शाखेच्या वतीने मराठी स्वाक्षरी अभियानाचे आयोजन केले होते. या स्पर्धेला सुप्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांनी उपस्थिती दर्शवली होती.

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने नागरिकांमध्ये मराठी भाषेविषयी आदर, प्रेम निर्माण व्हावे तसेच रोजच्या दैनंदिन जीवनात मराठी भाषेचा वापर करण्यात यावा या हेतूने मनसेच्या जुई नगर पदाधिकाऱ्यांनी मराठी स्वाक्षरी अभियानाचे आयोजन केले होते. प्रभागातील नागरिकांनी उस्फुर्तपणे येवून मराठी स्वाक्षरी अभियानांत सहभाग नोंदवला. नवी मुंबईकर असलेले प्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांनी सदर अभियानास



भेट देवून अभियानाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी उपक्रमास भेट देऊन सर्वांना मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी विभाग अध्यक्ष अक्षय मोरे, उप विभाग अध्यक्ष अजय मोरे, शाखा अध्यक्ष संकेत बोडके, मयूर कारंडे, उपशाखा अध्यक्ष पवन बुधे, सुशांत घोरपडे आदी उपस्थित होते.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीने साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नवी मुंबई जिल्ह्यातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्ताने विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. संवाद सत्र मंगळवारी (दि. २८) आयोजित करण्यात आले होते.

कोपरखैरणे, सेक्टर ११ मधील, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ९४ सीबीएसईमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनात विज्ञानाने आधुनिकता आणली आहे. हि आधुनिकता आपला पेहराव, निवास, दळणवळण, संपर्क, आरोग्य इत्यादी सर्व अंगाने बहरलेली दिसते. विज्ञानाने काळाच्या कुपीतील असंख्य रहस्य आपल्यापुढे सूत्रबद्ध मांडली



आहेत. काळाच्या गतीवर विज्ञानाने स्वार होऊन आपण त्या गतीला आपल्या मनानुसार वळवू शकतो. विज्ञान मानवाला जात, धर्म, प्रांत या पलिकडे पहायला शिकवते. मुळात विज्ञानाला जात, धर्म, प्रांत, लिंग या सारखे कोणतेही भेद मान्य नाही. विज्ञान मुळात निरपेक्ष आहे. आपण त्याचा जसा वापर करू तसे ते आपल्या भूमिकेत येते. या वेळी विद्यार्थ्यांना विविध चमत्काराची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली व त्या मागील विज्ञान उलगडून दाखविले.

विज्ञानाच्या आडून भोंदू बाबा बुवा चमत्काराचे दावे करून जनतेला फसवतात. आपण विज्ञान जाणून घेऊन अशी बुवाबाजी नष्ट करूया असा संदेश देण्यात आला. महा. अंनिसचे कार्यकर्ते अशोक निकम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक गवळी सर व समस्त शिक्षकवृंद उपस्थित होते.

## 'केबीपी'मध्ये कर्मवीर गीतगंधाली कार्यक्रम



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने लोकनेते रामशेठ ठाकूर पुरस्कृत कर्मवीर भाऊराव पाटील - गीतगंधाली हा संगीतमय कार्यक्रम सोमवारी (दि. २७) आयोजित करण्यात आला होता.

प्रा. संभाजी पाटील (सातारा) व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रस्तुत कार्यक्रम उत्कृष्टपणे सादर केला. यातून उपस्थितांचे मनोरंजन आणि प्रबोधनही झाले. प्रा. संभाजी पाटील यांनी अनेक गाणी त्यांनी सादर केली. कार्यक्रमात प्रज्ञा संभाजी पाटील यांनी निवेदन केले. तर अपर्णा अंबवणे यांनी पार्श्वगायिका म्हणून साथ दिली. मल्हारी गजभारे यांनी तबला वादनाची उत्तम साथ दिली.

कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे यांनी केले. आभार उपप्राचार्य सी. डी. भोसले यांनी मानले तर सुत्रसंचालन डॉ. आबासाहेब सरवदे यांनी केले.

## लिमये वाचनालयात मराठी भाषा दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल आणि कोकण मराठी साहित्य परिषद, पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिनानिमित्त वि. वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यावर कार्यक्रम आयोजित केला होता.



प्रमुख पाहुणे गजलकार ए. के. शेख होते. संस्थेच्या अध्यक्षा अॅड. सुनिता श्रीकांत जोशी यांनी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी प्रास्ताविक केले. अविनाश पाटील, कृष्णा राणे, नागनाथ डोलारे, राधिका साठे, अंकिता कदम, नंदिनी मंडराई, ताकमोगे, सुभाष कुडके, गोरेगावकर प्रशांत राजे, हेमा गद्रे यांच्यासह उपाध्यक्ष श्याम वालावलकर, सहकार्यवाह जयश्री शेटचे, कार्यकारिणी सभासद रमेश चव्हाण, तसेच मोठ्या संखेने वाचक वर्ग उपस्थित होता. सुनील खेडेकर यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल निकिता शिंदे, लिपिक संपदा जोशी व सेवक संजय दिवटे यांनी विशेष मेहनत घेतली.

## मराठी ही सर्वसामान्यांची भाषा
### कवी अशोक नायगावकर यांचे प्रतिपादन



**पनवेल : वार्ताहर**

मराठी ही सर्वसामान्यांची भाषा आहे, म्हणून तर तिचा गोडवा सर्वदूर गेला आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रसिध्द कवी अशोक नायगावकर यांनी महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल व कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल आयोजित मराठी भाषा गौरव दिन समारंभास केले.

या कार्यक्रमाला महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रिती महाजन, उपप्राचार्य प्रा. आर.ए.पाटील, नवीन पनवेल कोमसापच्या कवयित्री जोत्स्ना राजपूत, स्मिता गांधी, गणेश म्हात्रे, रामदास गायधने उपस्थित होते.

यापुढे बोलताना अशोक नायगावकर यांनी तरूणांनी त्याचे वाचन करावे असे आवाहन केले. त्यांनी आपल्या कविताही सादर केल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी आजच्या पिढीने आपल्या या मराठी भाषेचा वारसा जपावा असे सांगितले. प्राचार्य डॉ. ठाकूर व प्राचार्या डॉ. प्रिती महाजन यांचा कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने कवी अशोक नायगावकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषेविषयी प्रकाशित करण्यात आलेल्या प्रेरणा भित्तीपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मराठी भाषेच्या या विशेषकांची माहिती प्रा. शरयू नाईक यांनी सांगितली. सूत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, प्रा. प्रवीण गायकर, प्रा. शरयू नाईक यांनी केले. तर आभार डॉ. प्रा. सोनू लांडे यांनी मानले.

वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

**वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.**

**येत्या रविवारी, ५ मार्च २०२३ रोजी वाचूया इक्बाल शर्फ मुकादम यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.**

# ३६२ फेऱ्या असूनही रोहा आगार तोट्यात

## लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी चांगल्या गाड्यांची प्रतीक्षा

**रोहे: प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या राज्य परिवहन महामंडळचे रोहा आगार हे दुर्लक्षितच असल्याने प्रवाशांना विविध समस्या येथे भेडसावत आहे. आगारात आज ५० गाड्या उपलब्ध असून सरासरी ३६२ फेऱ्या होतात. या ५० गाड्यांत एकही शिवशाही रोहेकरांसाठी उपलब्ध नाही. नऊ गाड्या निमआराम आहेत. सद्यस्थितीत ६३ चालक व ५८ वाहक मेहनतीने व चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. त्यांनाही लांब पल्ल्याच्या प्रवास करताना दमछक होताना दिसत आहे.



रोहा आगारातून मुंबई, ठाणे, पुणे, मुरूड, अलिबाग, माणगाव, महाड, तुळजापूर, अक्कलकोट, कोल्हापूर, सिल्लोड आदी ठिकाणी गाड्या सोडण्यात येत आहेत. या मार्गावर शिवशाही उपलब्ध झाल्यास प्रवासी वाढण्याची शक्यता आहे, आत्र तसे न झाल्याने गेल्या महिन्यात रोहा आगाराला एक लाख ४८ हजारांचा तोटा झाला आहे.

यासोबतच बस आगाराच्या इमारतीचीही डागडुजी करणे आवश्यक आहे. याबाबत आगार प्रमुख सोफिया मुल्ला यांना विचारले असता, बसस्थानकातील सुविधांसाठी पाठपुरावा करून काम मंजुरीकडे पाठवले असल्याचे त्यांनी सांगितले.

रोहा आगारातून भालगावमार्गे मुरूड, सुपेगावमार्गे मुरूड, साळवमार्गे मुरूड, तळा, रेवदंडामार्गे अलिबाग, रामराजमार्गे अलिबाग, सुतारवाडी मार्गावर एसटी बससेवा सुरू आहे. खैरे–रोहा–ठाणे–बोरिवली ही गाडी अनेक वर्षे सुरू असलेली गाडी बंद करण्यात आली आहे. रोहा–कर्जत ही गाडी पुन्हा सुरू केल्यास रोहेकरांना फायद्याची ठरेल. त्याचप्रमाणे रोहा–ठाणे गाडीही सुरू करण्याची मागणी होत आहे. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सुट्टीच्या हंगामात पर्यटन व धार्मिक स्थळापर्यंत विशेष नियोजन केल्यास त्याला चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

> **रोहा आगारातून प्रवासासाठी उपलब्ध असलेल्या एसटी बसच्या माध्यमातून प्रवाशांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. आरामदायी प्रवास होण्यासाठी याकडे आम्ही लक्ष देत आहोत.**
>
> **–सोफिया मुल्ला, आगारप्रमुख**

# नांदगाव हायस्कूलमध्ये मराठी राजभाषा दिन

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथे आज मराठी राजभाषा दिन मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना मोफत पेन वाटप करण्यात आले.

या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर सुद्धा मुग्धा नांदगावकर व कार्तिकी गुंड यांनी मराठीमधून उत्कृष्ठ भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील विविध कविता वाचून दाखवल्या, तसेच राज्य गीतसुद्धा म्हणून दाखवले. कार्यक्रमासाठी प्रतीक पेडणेकर, राहील घलटे, योगेश पाटील, महेश वाडकर, भारत चव्हाण, दत्तत्रेय खुळपे, रेखा बोरजी, महादू अहिरे, शिल्पा कळके, राजश्री घाडगे, भारती नाईक, रवींद्र ढोले उपस्थित होते.



# पेण शहरातून २६ टन कचरा गोळा

## डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीचे निमित्त

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पेण येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांनी पेण शहरात महास्वछता अभियान राबविण्यात आले. या स्वछता अभियानामधून पेण शहरातून २५.९८ टन कचरा गोळा केला.

या वेळी पेण तालुक्यातील सोळा बैठकांतील श्री सदस्य उपस्थित होते. महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान,रेवदंडा यांच्यावतीने डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पेण शहरात स्वच्छता अभियानाचे आयोजन बुधवारी (दि.१) करण्यात आले होते.

यामध्ये पेण तहसील, वनविभाग, पोलीस स्टेशन,तालुका दिवाणी न्यायालय, उपविभागीय अधिकारी, रामवाडी ते महामार्ग पोलीस चौकी, पेण एसटी स्टँड ते चावडीनाका व आदी महत्त्वाच्या ठिकाणी सर्व शहरात तसेच शासकीय कार्यालय परिसरात हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



मोहिमेतून ६.४५. टन सुका कचरा व १९. ५३ टन ओला कचरा असा २५.९८ टन कचरा गोळा करून पेण नगरपालिकेच्या कचरा डेपो येथे नेण्यात आला. या या स्वच्छता मोहिमेत पेण नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील, माजी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य अधिकारी शिवाजी चव्हाण, मुख्य लेखापाल किरण शहा, पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रसाद म्हात्रे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील, उपजिल्हा रुग्णालयाचे कर्मचारी गीता भरूड, पांडुरंग गाडे, अच्युत रामलोड यांच्यासह नगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

### ११ ट्रॅक्टरमध्ये संकलन

*शहरातून गोळा केलेला कचरा डम्पिंग ग्राउंडवर नेण्यासाठी ११ ट्रॅक्टर, पाच टेम्पो, १४ पिकअप टेम्पो, चार छोटे टेम्पो व एका घंटागाडीचा वापर करण्यात आला.*

# कर्जतमधील दहा विहिरी होणार गाळमुक्त

## पाणीटंचाई कृती आराखड्यात २५ लाखांची तरतूद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यात तीन गावांमध्ये आणि सात वाड्यांमध्ये असलेल्या विहिरींमधील गाळ काढण्याचे आणि त्या दुरुस्त करण्याचे काम केले जाणार आहे. त्यासाठी २५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी दिली.



कर्जत तालुक्यात यावर्षी गतवर्षीच्या तुलनेत अधिक प्रमाणात पाणीटंचाई जाणवण्याची शक्यता आहे. त्यासाठी तीन गावांमध्ये आणि सात आदिवासीवाड्यांमध्ये या विहिरींमधील गाळ काढला आहे. त्यामुळे दहा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होईल, असा विश्वास जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाला आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने २५ लाखांची तरतूद केली असून, मे २०२३ पूर्वी विहिरी खोदण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यावर्षी पाणीटंचाई कृती आराखड्यात पेठ–वदप, किकवी–पाथराज, लाडिवाली–तिवरे ग्रामपंचायत अशा तीन गावात तर तुंगी–अंभेरपाडा, सागाची वाडी–दोन्ही आसल ग्रामपंचायत, खरवंडी कातकरी वाडी–बीड, कोतवालवाडी–नांदगाव, जांभूळवाडी–वारे आणि भडवळ ताकाची वाडी– दामत ग्रामपंचायत येथील विहिरींमधील गाळ काढण्याचे आणि दुरुस्त करण्याचे काम केले जाणार आहे.

# नेहरू युवा केंद्राद्वारे युवा स्वयंसेवकांची भरती

## इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह ९ मार्च पूर्वी अर्ज करावेत

**अलिबाग : जिमाका**

नेहरु युवा केंद्रांतर्गत प्रत्येक तालुक्यामध्ये दोन व कार्यालयामध्ये संगणक विभागामध्ये काम करण्याकरिता दोन स्वयंसेवक म्हणून युवक–युवतींची निवड करण्यात येणार आहे. तरी इच्छुक, पात्र उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन किंवा ऑफलाईन अर्ज ९ मार्चपूर्वी सादर करावेत, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्र, रायगड निशांत रौतेला यांनी केले आहे.

जिल्ह्यामध्ये युवकांचे नेटवर्क तयार करणे, भारत सरकारच्या विविध योजनांमध्ये सहभाग घेणे, युवकांना राष्ट्र निर्माण कार्यामध्ये योगदान देण्याची संधी, भारत सरकारतर्फे युवकांच्या नेतृत्व गुणांची क्षमता व त्यांची उर्जा स्वयंसेवेच्या माध्यमातून राष्ट्र निर्माण कार्यामध्ये वापर करणे,त्याचप्रमाणे साक्षरता, स्वच्छता, आरोग्य, लिंगभेद, सामाजिक समस्यांबाबत जनजागृती अभियान राबविणे, त्याकरिता युवकांना संगठीत करणे, युवक, महिला मंडळे यांच्याशी संपर्क वाढविणे, त्यांचा दुवा म्हणून कार्य करणे, शासकीय विभागाच्या सहकार्याने विविध कार्यक्रम राबविणे तसेच सहकार्य करणे याकरिता प्रत्येक तालुक्यामध्ये दोन व कार्यालयामध्ये संगणक विभागामध्ये काम करण्याकरिता दोन स्वयंसेवक म्हणून युवक युवतींची निवड करण्यात येणार आहे.

उमेदवाराची शैक्षणिक पात्रता कमीत कमी दहावी पास असणे आवश्यक आहे. वयोमर्यादा १ एप्रिल २०२३ रोजी १८पेक्षा जास्त व २९ पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अर्जदार नियमित विद्यार्थी किंवा नोकरी करणारा नसावा. निवड झालेल्या युवा स्वयंसेवकाला दर महिना पाच हजार रुपये मानधन देण्यात येइल. उमेदवार संबंधित तालुक्यातील रहिवासी असावा. राष्ट्रीय युवा स्वयंसेवक पद हे पगाराची नोकरी नाही तसेच स्वयंसेवक हा कायदेशीररित्या सरकारकडून कोणत्याही प्रकारच्या रोजगाराचा दावा करण्यास पात्र नसेल. अधिक माहिती व अर्ज www.nyks.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन किंवा ऑफलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ९ मार्च आहे. माहितीकरिता जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र रायगड–अलिबाग येथे कार्यालयीन वेळेमध्ये संपर्क साधावा, असे जिल्हा युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्र, रायगड निशांत रौतेला यांनी कळविले आहे.



**खोपोली : नगरपालिका हद्दीतील लौजी या गावात अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमात दीपप्रज्वलन कार्यक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. दीड दिवस हा कार्यक्रम सुरू होता. यानिमित्त प्रवचन, कीर्तन, भजन, तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.** (छाया : विनायक माडपे)

# कर्जत तहसील कार्यालय परिसरात आगीचा भडका; प्रशासनाची धावपळ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याचे शासकीय मुख्यालय असलेल्या तहसील कार्यलयाचा परिसर असलेला भाग बुधवारी (दि. १) दुपारी वणव्याच्या भक्षस्थानी पडला. या वणव्यामुळे तहसील कार्यालयाचा रेल्वे कडील भाग या वणव्याच्या भक्ष्यस्थानी पडला होता. वणव्यांमध्ये नुकसान झाले नाही मात्र गवत जळून डोंगर ओसाड झाला आहे.



कर्जत तहसील कार्यालयाच्या परिसराला कचरा परिसरात रेल्वे मार्गाच्या जवळ असलेलया गवताला आग लागली. दुपारच्या वेळी वातावरणातील वाढलेल्या उष्णतेमुळे आगीचा भडका उडत होता. त्यात वारादेखील वाहत असल्याने ही आग वेगाने पसरली. टेकडीवर तहसील कार्यालय, सब रजिस्ट्रेशन कार्यालय, कोषागार कार्यालय तसेच कर्जत पोलीस स्टेशनचे आरोपी ठेवण्याचे कस्टडी असल्याने सर्वांत घबराट निर्माण झाली.

आग वेगाने वर येत असल्याने बाहेरच्या भागात उभी असलेली अनेक दोनचाकी वाहने, चारचाकी वाहने त्वरीत ठलीही हानी झाली नाही. शहराच्या टेकडीवर असल्याने खाली आग लागल्यास त्याचा भडका वरपर्यंत दिले. आता कडक उन्हाळ्याचे दिवस असल्याने टेकडीवर सुकलेले गवत मोठ्या प्रमाणात आहे. त्यातच झाडेदेखील असल्याने आग लागल्यास ती आटोक्यात आणणे, जीकिरीचे काम असते.

दरवर्षी येथे ही आग लागण्याची घटना घडत असूनही मात्र संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग गांभीर्याने ही बाब घेत नसल्याचे निदर्शनास येते.

अनेक वृक्ष प्रेमी कर्जतकर याठिकाणी झाडे लावत असतात. झाडे मोठे होण्यासाठी नियमित पाणी टाकत असतात, मात्र लागलेल्या आगीत त्यांची मेहनत वाया जाते व मोठी झालेली झाडे जळून खाक होतात. यांत नागरिकांनी देखील आग लागू नये, अशी दक्षता घेणे गरजेचे आहे.

कर्जत नगर परिषदेच्या अग्निशमन दलचे दिनेश हिरे, प्रदीप हिरे, मारुती रोकडे यांनी आग आटोक्यात आणण्यास शर्थीचे प्रयत्न केले. कर्जत वीज कंपनीचे अभियंता योगेश साबळे यांच्यासह महावितरणचे कृष्णा कवठे, शेख यांनी वीजपुरवठा बंद करून सहकार्य केले.

# आधार कार्ड अपडेट नवीन फिचर विकसित

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ज्या नागरिकांना आधारकार्ड मिळाले आहे, परंतु १० वर्षांमध्ये एकदाही अद्ययावत केले नाही, अशा आधारकार्ड धारकांना 'डॉक्युमेंट अपडेट' हे नवीन फिचर विकसित करण्यात आले आहे. नागरिकांनी ओळखीचा पुरावा आणि रहिवासी पुरावा कागदपत्रे अद्ययावत करून त्यांचा आधार अद्ययावत करणे आवश्यक आहे.

ज्या नागरिकांना 'डॉक्युमेंट अपडेट' करण्याचे आहे त्यांनी myaadhaar (ऑनलाईन) पोर्टलद्वारे किंवा कोणत्याही आधार नोंदणी केंद्राला भेट देऊन आपले आधारकार्ड अद्ययावत करुन घ्यावे. असे आवाहन असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के–पाटील यांनी केले आहे.

# सागरी सुरक्षा कवच अभियानांतर्गत वाहनांची तपासणी

**मुरूड : प्रतिनिधी**

सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मुरूड पोलीस ठाणे अंतर्गत सागरी सुरक्षा कवच अभियान राबविण्यात आले. तालुक्यात दोन पोलीस ठाणे असून मुरूड व रेवदंडा पोलीस ठाणे हद्द मिळून सुमारे २५० वाहनांची तपासणी करण्यात आली. संशयित गाडीचा संशय आढळ्यास गाडीची सर्व कागदपत्रेसुद्धा तपासण्यात आली आहेत. या तपासणीत कोणतीही गाडी अथवा व्यक्ती संशयास्पद आढळून आलेला नाही.

रायगड जिल्हा विस्तृत समुद्रकिनारा लाभला असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने हा संवेदनशील म्हणून ओळखला जातो या बाबत विचार करून रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सतर्क राहावे, यासाठी सागरी सुरक्षा कवच अभियान सुरू केले आहे.



जिल्ह्याचा १२२ किमी. सागरी किनारा सुरक्षितता अधिक बळकट करण्याच्या दृष्टीकोनातून अतिरेकी कारवाई, दहशतवादी हल्ले रोखण्याकरीता सर्व सागरी विभागांची सतर्कता पडताळून पाहण्याकरीता हे अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये भारतीय नौदल, भारतीय तटरक्षक दल, पोलीस विभाग, भारतीय सीमा शुल्क विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मत्स्य व्यवसाय विभाग ईत्यादी आस्थापनाचा समावेश असतो. अभियानाकरीता रायगड पोलीस दलाकडून ८६ अधिकारी व ५०७ पोलीस अंमलदार तसेच नौका विभागाकडील आठ तांत्रिक अधिकारी, १९ अंमलदार व १८१ सागर रक्षक दल सदस्य नेमण्यात आले आहेत. मुरूड तालुक्यात साळाव चेकपोस्ट, उसरोली नाका, बाजारपेठ, खोरा बंदर,राजपुरी जेट्टी, सागरी किनारे व अन्य महत्त्वाच्या ठिकाणी हा बंदोबस्त लावण्यात आला आहे. मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस नाईक किशोर बठारे, राजु पाटील, पोलीस शिपाई महेश्वरी सावरकर आदींसह पोलीस बंदोबस्त ठिकठिकाणी ठेवण्यात आला आहे.

## आयसीसी कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत बदल

# अश्विन ठरला टेस्टमध्ये नंबर एकचा गोलंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत मोठा बदल झाला आहे. भारताचा स्टार फिरकीपटू आर. अश्विनने या क्रमवारीत अव्वल स्थान गाठले आहे. त्याने इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनला मागे टाकत नंबर एक कसोटी अव्वलस्थान पटकावला आहे.

आर. अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात दमदार कामगिरी केली होती, ज्याचा त्याला ताज्या क्रमवारीत फायदा झाला आहे. ३६ वर्षीय आर अश्विन २०१५मध्ये प्रथमच नंबर एक कसोटी गोलंदाज बनला आणि त्यानंतर तो या खुर्चीवर अनेकदा बसला आहे. त्याचवेळी टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज



जसप्रीत बुमराह एका स्थानाच्या फायदा घेऊन चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. रवींद्र जडेजानेही स्थान मिळवले असून, तो आठव्या क्रमांकावर पोहचला आहे. अशाप्रकारे आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत तीन भारतीय गोलंदाजांचा टॉप १०मध्ये समावेश करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी पाचव्या क्रमांकावर आहे.

आर. अश्विन हा ८६४ गुणांसह अव्वलस्थानी पोहचला आहे, तसेच, जेम्स अँडरसन हा ८५९ गुणांसह दुसऱ्या स्थानी घसरला आहे. यानंतर तिसऱ्या स्थानी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स ८५८ गुणांसह तिसऱ्या स्थानी आहे. सहाव्या क्रमांकावर इंग्लंडचा ओली रॉबिन्सन आणि सातव्या क्रमांकावर दक्षिण आफ्रिकेचा कागिसो रबाडा आहे. न्यूझीलंडचा काईल जेमिसन नवव्या तर ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क १०व्या क्रमांकावर आहे. मोहम्मद शमी १८व्या क्रमांकावर आहे. दुसरीकडे, जर आपण कसोटी अष्टपैलू रँकिंगबद्दल बोललो तर रवींद्र जडेजा आणि आर. अश्विन अनुक्रमे नंबर एक आणि नंबर दोनच्या सिंहासनावर विराजमान आहेत. अक्षर पटेल पाचव्या क्रमांकावर कायम आहे.

टीम इंडियाचा महान ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने तिसऱ्या कसोटी सामन्यात नऊ विकेट घेतल्यास तो ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक ११२ विकेट घेणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरेल.

# एनएमपीएलमध्ये बेलापूर ब्लास्टर्सचा सात गडी राखून विजय



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माझगाव क्रिकेट क्लब आयोजित मुंबई क्रिकेट असोसिएशन मान्यतेच्या पहिल्या नवी मुंबई प्रीमियर लीग (एनएमपीएल) क्रिकेट स्पर्धेत बेलापूर ब्लास्टर्सने विजयी प्रारंभ केला. बेलापूर ब्लास्टर्सने ओमकार उंबरकरच्या नाबाद अर्धशतकामुळे सानपाडा स्कोर्पियन्सचा सात गडी राखून पराभव केला. सानपाडा संघाचा सलामीवीर अरुण लवांडेने पाउण शतक केले. ओमकार उंबरकरला सामनावीर पुरस्काराने ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर अशोक शृंगारे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वेळी एनएमपीएलचे चेअरमन शाह आलम शेख, प्रदीप कासलीवाल, अभिजित घोष, भूपेंद्र सिन्हा आदी उपस्थित होते. अंबरनाथ अवेन्जर्सने पहिला साखळी सामना जिंकताना कोपरखैरणे टायटन्स संघाला सहा विकेटने नमविले.

दादोजी कोंडदेव स्टेडीयमवर बेलापूर ब्लास्टर्स विरुद्ध सानपाडा स्कॉर्पियन्स संघाने नाणेफेक जिंकून सुरुवातीला दमदार फलंदाजी केली. वरूण लवांडे (४६ चेंडूत ७६ धावा, चार षटकार व सहा चौकार) व रोनंकी अनिलकुमार (२४ चेंडूत ३१ धावा, तीन षटकार व दोन चौकार) यांनी आक्रमक फलंदाजी करून पहिल्या विकेटसाठी ६४ धावांची भागीदारी केली, परंतु त्यानंतर आलेल्या फलंदाजांना काबूत ठेवणारी मध्यमगती गोलंदाजी आकाश पारकर (३० धावांत तीन बळी) व साहिल फेगडे (३४ धावांत तीन बळी) यांनी केली. त्यामुळे सानपाडा स्कॉर्पियन्सला मर्यादित २० षटकांत सात बाद १४८ धावा नोंदविता आल्या. ओमकार उंबरकर (४० चेंडूत नाबाद ५० धावा, एक षटकार व सहा चौकार) व आशय सरदेसाई (२६ चेंडूत ३९ धावा, एक षटकार व सहा चौकार) यांच्या धडाकेबाज खेळामुळे बेलापूर ब्लास्टर्सने विजयी लक्ष्य १७.४ षटकात तीन बाद १५१ धावा फटकावीत सहज साध्य केले. दुसऱ्या सामन्यात सलामीवीर जय बिस्ता (३० चेंडूत ३३ धावा, चार चौकार) व सामनावीर विश्वजित जगदाळे (२१ चेंडूत ३२ धावा, तीन षटकार व दोन चौकार) यांच्या जलद फलंदाजीमुळे अंबरनाथ अवेन्जर्सने कोपरखैरणे टायटन्सची सर्वबाद १२८ धावसंख्या चार विकेटच्या मोबदल्यात ओलांडली.

# १४ वर्षीय मुलांच्या चॅम्पियनशिप लीग क्रिकेट स्पर्धेत शौर्यच्या नाबाद १७२ धावा



**पुणे : प्रतिनिधी**

पुनीत बालन केदार जाधव मेगा क्लब आयोजित १४ वर्षीय चॉम्पियनशीप मुलांच्या लीग क्रिकेट स्पर्धेत ब्रिलियंट क्रिकेट अकॅडमी विरुद्ध पुनीत बालन केदार जाधव क्रिकेट अकॅडमी यांच्यात ५० षटकीय सामना खेळला गेला ब्रिलियंट संघाकडून खेळताना ११ वर्षीय शौर्य जाधव याने १७३ चेंडूत २४ चौकार मारत नाबाद १७२ धावा केल्या.

या वेळी त्याला शिवरत्न सुर्यवंशी यांनी चांगली साथ देत ७६ धावा केल्या व २०१ धावांची भागीदारी केली. सुर्यवंशी बाद झाल्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या कृष्णा गायकवाड १७ धावा व पृथ्वी पाळणे ३९ धावा करीत संघाची धावसंख्या ५० षटकांत दोन बाद ३४४ बनवली या धावांचा पाठलाग करताना समोरील संघ १०९ धावांतच सर्वबाद झाला. गोलंदाजीमध्ये ब्रिलियंट संघाचे कृष्णा गायकवाड याने तीन विकेट पटकवल्या तर रुद्र जाधव यांनी एक विकेट घेत सामना जिंकून दिला. १७२ धावा व एक गडी बाद करणारा शौर्य जाधवला सामना जिंकल्यानंतर सामनावीर म्हणून घोषित करून पारितोषीक देण्यात आले.

## झुंझार युवक मंडळ पोयनाड क्रिकेट स्पर्धा

# लावास क्लबचा उपांत्य फेरीत प्रवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित कै. अॅड. शिरीष पाटील स्मृतीचषक ज्युनियर वयोगटातील लेदर बॉल ४० षटकांच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेतील 'बी' ग्रुप मध्ये लावास क्रिकेट क्लब पनवेल संघांनी तिन्ही साखळी फेरीतील सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

'बी' ग्रुप मध्ये असणाऱ्या एसबीसी महाड, भेंडखळ क्रिकेट अकॅडमी आणि पाचूरी क्रिकेट अकॅडमी कामोठे या तिन्ही संघांचा पराभव करून लावास क्रिकेट क्लब पनवेल संघांनी उपांत्य फेरीत आपली जागा निश्चित केली आहे. मंगळवारी झालेल्या साखळी फेरीच्या सामन्यात लावास संघाने पाचुरी क्रिकेट अकॅडमी संघाचा पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्विकारत पाचुरी क्रिकेट अकॅडमी संघांनी ४० षटकांमध्ये सर्व गडी बाद १७६ धावसंख्या उभारली. मधल्या फळीतील फलंदाज विराज पाटील यांनी सर्वाधिक ४३ तर अर्हम शेख यांनी २८ धावा काढल्या. ४० षटकांच्या समाप्तीनंतर संघाचा डाव १७६ धावसंख्येवर आटोपला. लावास संघाकडून स्वराज थारकुडे आणि आर्यन काळे यांनी प्रत्येकी चार फलंदाज बाद केले. प्रतिउत्तर देतांना लावास संघाकडून स्लामीला आलेल्या युग जोशी २५ तर स्वरा खेडेकर हिने १४ धावा काढून डावाला आकार दिला. मधल्या फळीत कबीर जगताप यांनी २० तर स्वराज थारकुडे यांनी दणदणीत खेळ करीत ३६ धावा काढल्या. पाचुरी क्रिकेट अकॅडमीकडून आदित्य पांडे याने तीन व अनिष म्हात्रे आणि कौशल म्हात्रे यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.



सामन्याचा सामनावीर म्हणून अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या स्वराज थारकुडे, स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू विराज पाटील, इमर्जिंग प्लेअर आदित्य पांडे उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून आर्यन चौहान यांना झुंझारचे सदस्य अजय टेमकर, सचिन पाटील, विरु पाचुरी, आतिष खेडेकर, सुरेंद्र जोशी, रोहित कार्ले, संकेश ढोळे, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# नागोठणे आयटीआयतर्फे विविध क्रीडा स्पर्धा उत्साहात



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे आयटीआयतर्फे व्यक्तिमत्त्व विकास वाढविण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या प्राचार्य प्रतिभा चव्हाण यांनी केले तर कार्यक्रमास जाधवर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमध्ये भाग घेतलेल्या प्रशिक्षणार्थी यांना उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

पुरुष कबड्डीमध्ये प्रथम आयएमसीपी व्यवसाय, द्वितीय वीजतंत्री व्यवसाय, तृतीय तारतंत्री व्यवसाय; महिला कबड्डी प्रथम वीजतंत्री विभाग, द्वितीय केमिकल विभाग, बेस्ट राईडर ऋषिकेश माथळ व बेस्ट डिफेन्डर रोशन काष्टे; खो-खो मुले प्रथम आयएमसीपी व्यवसाय, द्वितीय एओसीपी व्यवसाय, तृतीय वीजतंत्री व्यवसाय; खोखो मुली प्रथम केमिकल विभाग, द्वितीय वीजतंत्री विभाग, बेस्ट अंपायर मकरंद पाटील; क्रिकेट प्रथम एमएमसीपी व्यवसाय, द्वितीय एम. एम. व्ही. व्यवसाय, तृतीय तारतंत्री व्यवसाय, बेस्ट बॉलर योगेश राक्षिकर, बेस्ट बॅट्समन अमेय जोशी यांनी पटकाविला.

१०० मी धावणे मुली प्रथम तीर्था पाटील, द्वितीय कविता डोरे यांनी पटकाविला.

२०० मी मुली प्रथम तीर्था पाटील, द्वितीय सरिता शिद; कॅरम मुले प्रथम सुनील मचाळे व अभिषेक मोहिते, द्वितीय प्रतीक वाघीलकर, हितेश पाटील; मुली प्रथम बेबी शिद, द्वितीय अंजली लेंडी; बुद्धिबळ मुले प्रथम भालचंद्र निरगुडा, द्वितीय वेदांत पाटील; मुली प्रथम बेबी शिद, द्वितीय अंजली लेंडी यांना गौरविण्यात आले.

# राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत मिथुन, अनुपमाला विजेतेपद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रेल्वेच्या मिथुन मंजुनाथ आणि हरियाणाची अनुपमा उपाध्याय यांनी ८४व्या राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत विजेतेपद मिळवले. मिथुनने मध्य प्रदेशाच्या प्रियांशु राजावतचा२१-१६, २१-११ असा सहज पराभव केला. महिला एकेरीत अनुपमाने छत्तीसगडच्या आकर्षि कश्यपचे आव्हान २०-२२, २१-१७, २४-२२ असे तीन गेमच्या लढतीत मोडून काढले.

श्रीकांतवर दुसऱ्यांदा विजय मिळविल्यानंतर आत्मविश्वास दुणावलेल्या मिथुनने अंतिम लढतीत थॉमस चषक विजेत्या संघातील प्रियांशु राजावतविरुद्ध एकतर्फी वर्चस्व राखले. पहिल्या गेममध्ये आघाडीनंतर



गेमच्या मध्याला एका गुणाने मागे पडल्यानंतरही उत्तरार्धात मिथुनने आक्रमक खेळ करताना प्रियांशुवर दडपण आणले आणि पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममधील मिथुनचे वर्चस्व लक्षणीय होते. मिथुनच्या वेगवान आणि आक्रमक फटक्यांना प्रियांशु उत्तर देऊ शकला नाही. दुसऱ्या गेमच्या मध्यात ११-८ अशा आघाडीनंतर मिथुनने उत्तरार्धात प्रियांशुला केवळ तीनच गुणांची कमाई करून दिली.

महिला एकेरीत अनुपमाने १ तास १८ मिनिटांच्या कडव्या प्रतिकारानंतर सामना जिंकला. फटक्यांवर राखलेले अचूक नियंत्रण आणि फटक्यांची अचूक दिशाही अनुपमाच्या खेळाची ताकद ठरली. या जोरावरच पहिली गेम गमावल्यानंतरही अनुपमाने विजेतेपद मिळवले. मिश्र दुहेरीत हेमनागेंद्र बाबू आणि कनिका कन्वल या रेल्वेच्या जोडीने तेलंगणाच्या सिद्धार्थ एलान्गो आणि दिल्लीच्या खुशी गुप्ता जोडीचा २१-१७, २१-१६ असा सरळ दोन गेममध्ये पराभव केला. महिला दुहेरीत अव्वल मानांकित केरळची ट्रिसा जॉली आणि तेलंगणाच्या गायत्री गोपीचंद जोडीने दिल्लीच्या काव्या गुप्ता-दीपशिखा सिंगला संधीच मिळू दिली नाही.

ट्रिसा-गायत्रीने २१-१०, २१-९ अशी अंतिम लढत सहज जिंकली. पुरुष दुहेरीत कर्नाटकच्या कुशल-प्रकाश राज जोडीने महाराष्ट्राच्या दीप रामभिया-अक्षन शेट्टी जोडीचे आव्हान ८-२१, २१-१९, २१-८ असे संपुष्टात आणले.



**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्रशाळेत २७ ते २८ फेब्रुवारीदरम्यान कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन आणि बक्षीस वितरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी झाले. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, रघुनाथ देशमुख, प्रकाश कडू, महेंद्र घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**
(छाया : योगेश पाटील)








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com